गावात एकूण 40 बचत गट असून सर्व बचत गट दशसुत्रीचे पालन करतात. त्यापैकी 25 बचत गटांची उमेद मार्फत व 4 गटांची माविम मार्फत नोंदणी एनआरएलएम पोर्टलवर करण्यात आलेली आहे. तसे प्रमाणपत्र तालुका अभियान व्यवस्थापक तालुका अभियान कक्ष लातूर, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी दिलेले आहे. गावातील 83 टक्के महीलांचा बचत गटात सहभाग आहे.

सकाळ

## स्वयंसहाय्यता समूहाचे जनजागर शिबिर

लातूर, ता. २२ (बातमीदार) : सिकंदरपूर (ता. लातूर) येथील सरपंच रेश्मा माधवराव गंभिरे यांच्या पुढाकारातून स्वंसहाय्यता समुहाचे एकदिवसीय जनजागर शिबिर सिकंदरपूर येथे घेण्यात आले. याला मोठा प्रतिसाद मिळाला.

भारतीय स्टेट बँक व ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदेत ता. १२ ते २१ आक्टोबर या कालावधीत दहा दिवसांचे मोफत निवासी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले होते. या शिबिरात शेळी पालन व दुग्धव्यवसायाबद्दल अठरा ते पंचेचाळीस वयोगटातील नागरीकांना प्रशिक्षण देण्यात आले. यात सिकंदरपूर येथील वीस महिला व सात युवकांनी सहभाग घेतला होता. पण गावातील इतर महिला व सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायाची माहिती व्हावी याकरीता सरपंच श्रीमती गंभिरे यांच्या पुढाकारातून एक दिवसाचे हे शिबिर घेण्यात आले.

या शिबिरात सतीश कांबळे यांनी दुग्धव्यवसाय, शेळीपालन, शिवणकाम, लघू उद्योग या विषयावर मार्गदर्शन केले. सुधाकर सुतार यांनी बँकिंग, उत्पादन, विक्री या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. या जनजागर शिबिरात प्रशिक्षण घेतलेल्या २७ महिला व पुरुषांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले.



लातूर : सिकंदरपूर येथे स्वयंसहाय्यता समुहाच्या शिबिरात प्रशिक्षणार्थींना सरपंच रेश्मा गंभिरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप झाले. यावेळी माधव गंभिरे, सुधाकर सुतार, सतीश कांबळे आदी.

गावातील महिलांना स्वयंपूर्ण करून गावातच रोजगार निर्मिती केली जाईल अशी ग्वाही सरपंच श्रीमती गंभिरे यांनी या कार्यक्रमात दिली. प्रास्ताविक माधव गंभिरे यांनी केले तर सूत्रसंचालन संदीप पुणेकर यांनी केले.

Aurangabad, Latur-Today
23/10/2021 Page No. 2

देशोन्नती

## सिकंदरपूर येथे जागतिक महिलादिन उत्साहात साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

लातूर ▬ ८ मार्च जागतिक महिलादिनानिमित्त सिकंदरपूर येथे जागतिक महिलादिन विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.



सर्व प्रथम स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायतच्या वतीने पाणी, स्वच्छता व घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन करण्यासाठी प्रभात फेरी काढून जनजागृती करण्यात आली.

या प्रभात फेरीत सरपंच रेशमा माधवराव गंभीरे, उपसरपंच पिराजी इटकर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा मिना गंभीरे, उपाध्यक्ष अशोक ताटे, ग्रामपंचायत सदस्य उध्दव माधवराव गंभीरे, बाळूबाई सुरेश इटकर, रामूबाई सुरेश लष्करे, मुख्याध्यापिका लिना स्वामी, आदर्श शिक्षक रमेश आलापुरे सह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तद्नंतर कोविड मध्ये काम करणाऱ्या आशा कार्यकर्ती, अंगणवाडी कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका व महीला बचत गटातील उत्कृष्ट काम करणाऱ्या महीलांचा सन्मान करण्यात आला.

Deshonnati Edition
Mar 10, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

उमेद
शिकेल मी, विकसेल मी...

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**
**तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष,पंचायत समिती,लातूर.**
**कार्यालय पत्ता :- तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष,पंचायत समिती,लातूर**
Email :-.bmmulatur@gmail.com

जा.क्र.12/ताअव्यक/MSRLM/2023
पंचायत समिती,लातूर
दिनांक:-01/04/2023

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की,मौजे सिकंदरपूर ता.जि.लातूर येथे सन 2022-23 या वर्षामध्ये 40 बचत गट असून उमेद (MSRLM) अंतर्गत 22 रजिस्टर्ड बचत गट असून 11 गट हे रजिस्ट्रेशन होण्यासाठी पात्र आहेत. त्यांची 83% टक्केवारी आहे.एकूण 33 बचत गटामध्ये गावातील एकूण 330 महिलाचा समावेश आहे.या महिलांकडून दशसुत्रीचे नियमित पालन केले जाते.

करिता सबब प्रमाणपत्र देण्यात येत आहे .

तालुका अभियान व्यवस्थापक
तालुका अभियान कक्ष
लातूर

**MAHILA ARTHIK VIKAS MAHAMANDAL**
**महिला आर्थिक विकास महामंडळ**
( Govt. of Maharashtra Undertaking) (महाराष्ट्र शासन अंगिकृत)

District Office :
Trimurti Bhavan, 2nd Floor,
above Bank of India,Near Uday
Petrol Pump,Barshi Road,Latur-413 531
Phone : (02382)222564
Email - latur.mavim@gmail.com

जिल्हा कार्यालय :
'त्रिमूर्ती भवन' दुसरा मजला,
बँक ऑफ इंडियाच्या वर, उदय पेट्रोल पंप जवळ,बार्शी रोड, लातूर-४१३ ५३१
फोन (०२३८२)२२२५६४

CIN : U74999MH1975SGC018170

एकजुटीतून अवतरेल समृद्धीची नवप्रभा
MAVIM
माविम

जा. क्र.; मावीम/लातूर/SHG/२०२४/ 128

दि. ०३/१०/२०२४

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, मौजे सिकंदपूर, ता. जि. लातूर येथे महिला आर्थिक विकास महामंडळ (मावीम) जिल्हा कार्यालय लातूर अंतर्गत जयहिंद लोकसंचलीत साधन केंद्र (JAIHIND CMRC) लातूर (पूर्व) च्या माध्यमातून नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत एकूण ४ महिला बचत गटांची स्थापना करण्यात आलेली असून त्यात एकूण ४० महिलांचा समावेश आहे, हे सर्व बचत गट मावीम कडे नोंदनिकृत आहेत व सदरील बचत गट दश सूत्री चे पालन करतात.

करिता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

जिल्हा समन्वय अधिकारी
माविम, लातूर

GrihaNirman Bhavan (MHADA),Mazzanine Floor,Bandra (E) Mumbai- 400051 Tel : 26591629/26591013 Fax : 26590574

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## -: प्लॅस्टीक वापर बंदी :-

ग्रामसभा दि.02/10/2022 विषय क्रं 06 नुसार 0.5 मायक्रॉनचे प्लास्टीक वापरास बंदी घालण्यात आलेली असून त्याची काटेकोरपणे अमलबजावणी केली जाते.कोणी वापरताना आढळून आल्यास त्यास प्रथम 500 रु व दुबार आढळून आल्यास 1000 रु दंडाची तरतूर करण्यात आलेली आहे .तसे बोर्ड ही गावात जागोजागी लावण्यात आलेले आहेत






# -: दायित्व :--

## सन 2022-23 करवसुली दर्शवणारा तक्ता

| तपशील | मागणी | | | वसुली | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागील | चालु | एकून | मागील | चालु | एकून | |
| घरपट्टी | 230078 | 503354 | 733078 | 230077 | 454648 | 684725 | 93.40% |
| विजकर | 2600 | 8260 | 10860 | 2600 | 7415 | 10015 | 92.21% |
| आरोग्यकर | 2600 | 8260 | 10860 | 2600 | 7415 | 10015 | 92.21% |
| पाणीपट्टी | 0 | 32400 | 32400 | 0 | 32400 | 32400 | 100% |
| एकून | 235278 | 552274 | 787552 | 235277 | 501578 | 737155 | 93.60% |

## सन 2022-23 15 टक्के मागासवर्गीय,10 टक्के महिला बालकल्याण व 5 टक्के दिव्यांगावरील खर्च

| अ.क्र. | तपशील | केलेली तरतूद | झालेला खर्च | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | 15 टक्के मागासवर्गीय | 118132 | | |
| 2 | 10 टक्के महिला बालकल्याण | 78755 | | |
| 3 | 5 टक्के दिव्यांग | 39378 | | |
| | एकून | | | |

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## -: दायित्व :--

## : पाणीपुरवठा व पथ दिवे विज बिले भरणा :-

वीजबिल एम.एस.ई.डी.सी.एल.कडे नियमित भरणा करण्यात येते.

महावितरण

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

( महाराष्ट्र शासन उपक्रम )

CIN 401009MH2005SGC153645
GSTIN 27AAECM2933K1ZB

**Please Select Language for Printing Receipt in English/मराठी.** मराठी

**पावती**

| | |
|---|---|
| **देय दिनांक:** | ०४-०३-२०२३ ००:००:०० |
| **पावती क्र:** | ९८१७८७६ |
| **देय क्र:** | ९८१७८७६ |
| **देयक प्रकार:** | लघुदाब |

**ग्राहक तपशील**

| | |
|---|---|
| **ग्राहक क्र:** | ६१०३६०००२६६० |
| **ग्राहकाचे नाव:** | धी सरपंच ग्राम पन्च्येत |
| **बिलिंग युनिट/उपविभाग:** | ५१२६ / लातूर (ग्रामीण) |
| **विभाग:** | लातूर (५१८) |
| **मंडळ:** | लातूर (६८०) |
| **पावती प्रकार :** | ०१-ऊर्जा देयक |
| **रक्कम :** | ₹.१०००० |
| **एकूण रक्कम:** | ₹.१०००० |
| **एकूण रक्कम (अक्षरी ):** | दहा हजार रुपये फक्त |
| **भरणा प्रकार:** | धनादेश |
| **भरणा प्रणाली/माध्यम:** | OCCS Receipts |

https://wss.mahadiscom.in/wss/wss?uiActionName=getCashPaymentRecieptOCCS&receiptNumber=9817876&RecTypeCode=01&consumerNumber=... 1/2

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## -: दायित्व :--

### -: लेखा परीक्षण शंकाची पूर्तता :-

सन 2022-23 पर्यंत ग्रामपंचायतचे लेखा परीक्षण झाले असून 100 टक्के शंकाची पूर्तता ग्रामपंचायतीने केलेली आहे

### -: ग्रामसभेचे आयोजन :-

सन 2022-23 या आर्थिक वर्षात झालेल्या ग्रामसभा व महिला सभा

**ग्रामसभा**

| ग्रामसभा दिनांक | उपस्थित सदस्य संख्या |
|---|---|
| 01/05/2022 | 160 |
| 15/08/2022 | 136 |
| 02/10/2022 | 160 |
| 26/01/2023 | 105 |

**महिलासभा**

| महिला सभा दिनांक | उपस्थित सदस्य संख्या |
|---|---|
| 30/041/2022 | 40 |
| 14/08/2022 | 38 |
| 01/10/2022 | 39 |
| 25/01/2023 | 94 |

नियमाप्रमाणे सर्व सभा गणसंख्या पूर्ण होऊनच झालेल्या आहे.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## गावांची ग्रामसभा व महिला सभा अत्यंत शांत व खेळीमेळीच्या वातावरणात चांगल्याप्रकारे संपन्न होतात










### सिकंदरपूर येथील ग्रामसभा खेळीमेळीत संपन्न

सिकंदरपूर : ७४ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त गावच्या प्रथम नागरीक सिकंदरपूरच्या सरपंच रेशमा गंभीरे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यानंतर स. १० वा. ग्रामपंचायत कार्यालय सिकंदरपूर येथे सरपंचांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

या ग्रामसभेत सुरुवातीला भारताच्या संविधानाच्या उद्देशिकाचे वाचन करुन गाव तंबाखू, बीडी, सिगारेट, दारु मुक्त करुन गाव आरोग्यदायी करण्यासाठी ग्रामस्थांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

या ग्रामसभेस उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दव गंभीरे, बाळुबाई इटकर, रामुबाई लष्करे, तंटामुक्ती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष सदस्य व ग्रामस्थ बहुसंख्ये उपस्थित होते.

प्रास्ताविकात ग्रामसभा प्रभारी सचिव रमेश आलापुरे यांनी सभेच्या विषय पत्रिकेचे वाचन केले.

अध्यक्षीय समारोपात सरपंच रेशमा गंभीरे यांनी जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या परीपत्रकाचे वाचन केले. आरोग्यदायी गाव, स्वच्छ गाव-हरीत गाव यावर काम करण्याचे ग्रामसभेत सांगितले. आरोग्यसेवक एस. बी. पवार यांनी कुष्ठरोग व टी. बी. निर्मुलन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

## -: सामाजिक दायित्व :-

### सेवांची व दाखल्यांची मागणी मुदतीत पूर्तता

सन 2022-23 मध्ये लोकसेवा हक्क अधिनियमानुसार ग्रा. पं कडे एकूण ...दाखल्यांची मागणी करण्यात आली आहे. सर्व 100 टक्के दाखले संबंधीतास मुदतीत देण्यात आले.

### मादक द्रव्यांची विक्री व सेवन यावर बंदी

ग्रामसभा दि.02/10/2022 ठराव क्रं 07 नुसार मादक द्रव्यांची विक्री व सेवन यांवर बंदी घालण्यात आलेली असून त्याची काटेकोरपणे अमलबजावणी केली जाते. जर कोन्ही व्यक्ती मादक द्रव्यांचे सेवन केल्याचे आढळून आल्यास त्यास 1000 रु दंडाची तरतूर करण्यात आलेली आहे. तसे बोर्ड ही गावात जागोजागी लावण्यात आलेले आहेत.


### एकही फौजदारी गुन्हे नसले बाबत

मागील सन 2022-23 या वर्षामध्ये एकही फौजदारी प्रकरणा गुन्हा गावामध्ये नोंद झाला नाही.या बाबतचे पोलीस स्टेशन ग्रामीण यांचे प्रमाणपत्र प्राप्त आहे.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## -: सामाजिक दायित्व :-



**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की,मौजे सिकंदरपुर ता.जि.लातूर येथील सन 2022-23 या आर्थिक वर्षात कोणतेही फौजदारी गुन्हे दाखल /नोंद झालेले नाहीत.

करिता सबब प्रमाणपत्र देण्यात येते .

दिनांक:-31/03/2023

ठिकाण:-लातूर

(अनिल जगदाळे)
पो. ह./1267
पो. स्टे. लातूर ग्रामीण



## -: सामाजिक दायित्व :-

### -: सामुदायिक विवाह सोहळा/अंतरजातीय विवाह सोहळा :-

गावामध्ये मागील वर्षामध्ये एक सामुदायिक विवाह सोहळा व दोन अंतरजातीय विवाह संपन्न झालेले आहेत.









# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## -: अपारंपरिक ऊर्जा व पर्यावरण :-

### -: LED दिवे वापर :-

गावामध्ये 100% घरात LED बल्बचा वापर करण्यात येतो तसेच सार्वजनिक ठिकाणी सर्व विद्युत पोलवर 100% LED पथदिवे बसविण्यात आलेले आहेत व गावात दोन सौर पथदिवे असून दोन्हीही चालू आहेत.





**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की,मौजे सिकंदरपूर ता.जि.लातूर येथे सन 2022-23 या वर्षामध्ये गावातील सर्व कुटुंबाकडे 100 % एल.ई.डी.बल्ब असून त्याचा वापर होतो तसेच गावातील सर्व सार्वजनिक ठिकाणी व विद्युत पथदिवे यावर 100 % एल.ई.डी .पथदिवे बसविण्यात आलेली आहेत.

करिता मौजे सिकंदरपूर ता.जि.लातूर यांना गाव 100 %एल.ई.डी.वापर असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येते .

दिनांक:-31/03/2023

ठिकाण:-सिकंदरपुर

Junior Engineer
Babhalgaon Unit.



# -: अपारंपरिक ऊर्जा व पर्यावरण :-

## -: बायोगॅस :-

गावामध्ये चार बायोगॅस असून चारही चालू आहेत.









# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## -: अपारंपरिक ऊर्जा व पर्यावरण :-

### -: वृक्षलगावड:-

गावाची लोकसंख्या 1554 असून गावामध्ये 4700 वृक्ष लागवड करून त्याचे सवर्धन करण्यात आलेले आहे.



पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
16 Sep 2022

▶सिकंदरपूर ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामाची गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांनी केली पाहणी

**बिहार पॅटर्न पध्दतीने 300 नारळाच्या लागवडीचा शुभारंभ**

**आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ होणार**

सिकंदरपूर येथील हनुमान मंदिरा समोरील सभागृह बांधकाम माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या स्थानिक विकास निधी मधुन १० लक्ष रुपये मंजूर असुन त्याचा शुभारंभ व जनसुविधेमधुन पुर्ण झालेल्या कामाचा शुभारंभ आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. त्यांनी सिकंदरपूरच्या विविध विकास कामासाठी भरघोस निधी मंजूर केल्याबद्दल सरपंच रेशमा माधवराव गंभिरे यांनी विशेष आभार मानले.

**लातूर : प्रतिनिधी**

माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या स्थानिक विकास निधी मधुन लातूर तालुक्यातील सिकंदरपूर ग्रामपंचायतीच्या इमारतीचे काम प्रगती पथावर याची पहाणी करून लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांच्या हस्ते बिहार पॅटर्न पध्दतीने ३०० नारळ वृक्षलागवडीचा शुभारंभ करण्यात आला.

या वेळी सरपंच संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष माधव गंभिरे, सरपंच सौ. रेशमा माधवराव गंभिरे, उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दव गंभिरे, सुरेश इटकर, सुरेश लष्करे, पं. स. चे विस्तार अधिकारी नीलेश सोमाणी, बांधकाम विभागाचे अभियंता व्ही. बी. बिरादार, शिक्षक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष केशव गंभिरे, ग्रामविकास अधिकारी संजय घाडगे उपस्थित होते.

लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके - पाटील यांनी सिकंदरपूर येथील जन सुविधा अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकास कामांची व नवीन ग्रामपंचायत ईमारत बांधकाम पाहणी केली. नवीन वस्ती विठ्ठल नगर येथील खडीकरण-मजबुतीकरण झालेले रस्ते, स्मशानभुमी येथील सुरू असलेल्या आर. सी. सी. कंपाऊंड वाल बांधकाम कामाची पाहणी केली. या स्मशानभुमीत १ हजार २७३ वृक्ष लागवड मिया वाकी पध्दतीने केलेली आहे. तसेच पंधराव्या वित्त आयोगातून जि. प. शाळा व अंगणवाडीच्या विविध साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात माधव गंभिरे यांनी ग्रामपंचायतच्या १७ महिन्याच्या कार्यकाळात राबवलेल्या विविध उपक्रमांची व विकास कामाची सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचलन रमेश आलापुरे यांनी केले तर आभार संजय घाडगे यांनी मानले. कार्यक्रमास मुख्याध्यापिका लिना स्वामी, आदर्श शिक्षक रमेश आलापुरे, विद्या गायकवाड, उपक्रमशील शिक्षिका संगीता कौडगी, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी मदतणीस यांच्यासह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.








# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## -: अपारंपरिक ऊर्जा व पर्यावरण :-

### -: जलसंधारण :-

ग्रा.पं. सिकंदरपूर अंतर्गत मागील आर्थिक वर्षामध्ये लोकसभागातून रेन वाटर हरवेस्टिंग 20 नाला खोलीकरन व सरळीकरण/नाला बांधकाम व सिमेंट कोंक्रिट/बंधारा बांधकाम (200 मी) व बंधारा बांधणी अशी एकूण 19 लक्ष रूपयची कामे जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत करण्यात आलेली असून तसे प्रमाणपत्र शाखा अभियंता ल.पा/पा.पु.उपविभाग जिल्हा परिषद लातूर यांनी दिलेले आहे.



**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, मौजे सिकंदरपूर ता.जि.लातूर येथे सन 2022-23 या वर्षामध्ये लोकसहभागातून जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत खालील कामे करण्यात आलेली आहेत.

अ.क्र.कामाचे नाव अंदाजे मुल्यांकन

1.रेनवॉटर हार्वेस्टिंग (20) 4.00 लक्ष

2.नाला खोलीकरण व सरळीकरण/नाला बांधकाम व सिमेंट कॉक्रीट बंधारा बांधकाम (200 मी )व बंधारा बांधणे. 15.00 लक्ष रु

म्हणून सबब लोकसहभागातून 19.00 लक्ष रु.चे जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत कामे झाल्या बाबत मुल्यांकन प्रमाणपत्र देण्यात येते.

दिनांक:-31/03/2023

ठिकाण:-सिकंदरपुर

शाखा अभियंता
ल.पा.उपविभाग जि.प.लातूर








ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## -: पारदर्शकता व तंत्रज्ञान :-

### :- ग्रामपंचायतींचे सर्व अभिलेखांचे संगणकीकरण :-

- ग्रामपंचायत लेखा संहिता 2011 मधील 1 ते 33 नमुने संगणकीकरण करण्यात आलेली आहेत.



ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

आपले सरकार

CSC
e-Governance Services India Limited

कागदरहित ग्रामपंचायत

सिकंदरपूर ग्रामपंचायत

मा.श्री. कलबुने के.बी.यांनी सन २०२२-२०२३ मध्ये ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासनाच्या सुचनेनुसार "आपले सरकार सेवा केंद्र" या प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायत सिकंदरपूर चे १ ते ३३ नमुन्यातील कामकाज संगणकीकृत करुन दाखल्यांचे वितरण सुरु करुन, ग्रामपंचायत पेपरलेस केल्या बद्दल अभिनंदन.

यापुढेही आपणाकडून अशाच उत्कृष्ट कामकाजाची अपेक्षा.


गटविकास अधिकारी
पंचायत समिती, लातूर जि. लातूर


# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## -: पारदर्शकता व तंत्रज्ञान :-

### -: संगणकीकरनाद्वारे नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या सुविधा :-

ग्रामपंचायतद्वारे देण्यात येणारे सर्व दाखले संगणकीकृत देण्यात येतात






आपले सरकार CSC

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत

ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येणारे दाखले / प्रमाणपत्रे

प्रमाणपत्रे, अर्जासोबत द्यावयाचे कागदपत्रे,लोकसेवा अर्ज, बंद करण्यात आलेले प्रमाणपत्रे, स्वयंघोषणापत्र नमुने

संदर्भ: १) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५
२) ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.१४ जुलै २०१५
३) अधिसुचना ग्रामविकास विभाग-दि.१२ फेब्रुवारी २०१९
४) ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.१३ फेब्रुवारी २०१९

अनुसुची

सदरील अधिसुचनेनुसार ग्रामविकास विभागामार्फत ग्रामपंचायतीद्वारे पुरविण्याच्या लोकसेवा, सेवा पुरविण्याचा कालावधी, पदनिर्देशित अधिकारी व अपीलीय प्राधिकारी

| अ. क्र. | लोकसेवेचे नाव | सेवा पुरविण्यासाठी कालमर्यादा (कामकाजाचे दिवस) | प्रमाणपत्र फिस | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म नोंद दाखला | ७ दिवस | २०रु. | ग्रामपंचायत अधिकारी | सहाय्यक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| २ | मृत्यु नोंद दाखला | ७ दिवस | २०रु. | ग्रामपंचायत अधिकारी | सहाय्यक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ३ | विवाह नोंद दाखला | ७ दिवस | २०रु. | ग्रामपंचायत अधिकारी | सहाय्यक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ४ | दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दाखला | ७ दिवस | निशुल्क | गट विकास अधिकारी | सहाय्यक गट विकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) |
| ५ | ग्रामपंचायत येणे बाकी नसल्याचा दाखला | ५ दिवस | २०रु. | ग्रामपंचायत अधिकारी | सहाय्यक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ६ | नमुना ८ चा उतारा | ५ दिवस | २०रु. | ग्रामपंचायत अधिकारी | सहाय्यक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ७ | निराधार असल्याचा दाखला | २० दिवस | २०रु. | ग्रामपंचायत अधिकारी | सहाय्यक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |

१३ सेवापैकी वगळण्यात आलेल्या/बंद केलेल्या लोकसेवा/दाखले,स्वयंघोषणापत्र सादर करावे.

१) रहिवाशी दाखला २) हयातीचा दाखला ३) शौचालयाचा दाखला ४) विधवा असल्याचा दाखला ५) परित्यक्ता असल्याचा दाखला ६) विभक्त कटूंबाचा दाखला

बंद करण्यात आलेले इतर दाखले व प्रमाणपत्र

१) वीजेच्या जोडणीसाठी नाहरकत प्रमाणपत्र २) कोणत्याही योजनेचा लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र ३) नळ जोडणीसाठी अनुमती प्रमाणपत्र ४) चारित्र्याचा दाखला ५) नौकरी व्यवसायासाठी नाहरकत प्रमाणपत्र ६) जिल्हा परिषद फंडातून कृषि साहित्य खरेदी ७) बचत गटांना खेळते भागभांडवल बँकेमार्फत कर्ज पुरवठा ८) बेरोजगार प्रमाणपत्र ९) निराधार योजनेसाठी वयाचा दाखला १०) अविवाहीत असल्याचा दाखला

ग्रामसंसद भवन सिकंदरपूर, ता.जि.लातूर



# -: पारदर्शकता व तंत्रज्ञान :-

## ग्रामपंचायतीशी संबंध नसलेल्या व लोकासाठी उपयोगी इतर सेवा

1) आयुष्यमान भारत चे नाव नोंदणी करण्यात आली आहे. व लाभार्थ्यांना हेल्थ कार्ड वाटप करण्यात आले.

2) महसूल विभागामार्फत देण्यात येणारे उत्पनाचे प्रमाणपत्र महाऑनलाईन तर्फे उपलब्ध करुन देण्यात आले.

3) संगणक साक्षरता कार्यक्रम (पीएमजी दिशा) सध्या सुरु आहे.

4) गावातील व्यक्तींना मोबाईल रिचार्जची सुविधा पुरविण्यात येते.

• ग्रामसभांची माहिती www.fast2sms.com या संकेतस्थळावून बल्क एसएमएसद्वारे नागरिकांना देण्यात येते. तसेच कबनसांगवी येथील नागरिकांचा WhatsAPP Broadcast ग्रुप ग्रामपंचायतव्दारे तयार करण्यात आला असून लोकांना विविध माहीती व ग्रामसभा सूचना देण्यात येते.

* गावात विविध विकास कामांची सर्व योजनांची माहीती फलक त्यात्या कामाच्या ठिकाणी लावण्यात आलेली आहेत

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## -: पारदर्शकता व तंत्रज्ञान :-

### -: ग्रा.पं,सिकंदरपूर येथे सर्व योजनाचे फलक लावणेत येतात :-












## -: पारदर्शकता व तंत्रज्ञान :-

### -: ग्रामपंचायतीचे संकेतस्थळा वर सुधारित तंत्रज्ञानाचा वापर :-

•ग्रामपंचायतींच्या http://www.gpsikandarpur.com संकेतस्थळावर सर्व योजनांची व सर्व जमा-खर्चासह माहीती ईग्रामसॉफ्ट अज्ञावली मध्ये देण्यात आली आहे






# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## -: पारदर्शकता व तंत्रज्ञान :-

### -: आधार कार्ड :-

- गावात सर्व लोकांनी अधार कार्ड काढले असून 100% लोकांची यादी (1714) ग्रामपंचायतीकडे उपलब्ध आहे.



CERTIFICATE OF REGISTRATION

ICI UK

This is to certify that the management system of

GRAMPANCHAYAT SIKANDARPUR

has been formally assessed by

INTERNATIONAL CERTIFICATION & INSPECTION UK LTD.

and found to comply with the requirements of

ISO 9001:2015

(Quality Management System)

Scope of Registration:

Provision of Services For Village In The Area of General Administration, Health Education Training, Animal Husbandry, Water Supply, Works, Finance, Account, Minor Irrigation, Social Welfare, Agriculture, Women and Child Welfare.

Registered Site (s):

At Post Babhalgaon, Sikandarpur, Tal, District.: Latur - 413531, India.

:: Certificate No :: ICI/9193526/24

| | |
|---|---|
| *Date of initial registration:* | 03 October 2024 |
| *First Surveillance Audit on or before:* | 03 September 2025 |
| *Second Surveillance Audit on or before:* | 03 September 2026 |
| *Re-certification Due:* | 02 October 2027 |

This Certificate is property of ICI UK Ltd. and remains valid subject to satisfactory surveillance audits.

Peter Collins

Ex. Director

International Certification & Inspection UK Limited.

Kemp House, 160 City Road, London, EC1V 2NX, United Kingdom

ACCREDITATION BOARD FOR CERTIFICATION BODIES

ICI CERTIFIED

*To check validity of the certificate please visit at www.ici-uk.co*

This certification of registration is issued by International Certification & Inspection UK Limited accredited with Accreditation Board For Certification bodies (www.ab-cb.org). This certificate remains the property of International Certification & Inspection UK Limited and must be returned upon request.



CERTIFICATE OF REGISTRATION

ICI UK

This is to certify that the management system of

ANGANWADI NO 1 SIKANDARPUR

has been formally assessed by

INTERNATIONAL CERTIFICATION & INSPECTION UK LTD.

and found to comply with the requirements of

ISO 9001:2015

(Quality Management System)

Scope of Registration:

Providing Services of Health, Nutritional and Primary Services to Child. Adolescent Girls, Pregnant and Lactating Women and General Awareness of Nutrition and Health Value To Society.

Registered Site (s):

At Post Babhalgaon, Sikandarpur, Tal, District.: Latur - 413531, India.

:: Certificate No :: ICI/9191582/24

| | |
|---|---|
| *Date of initial registration:* | 03 October 2024 |
| *First Surveillance Audit on or before:* | 03 September 2025 |
| *Second Surveillance Audit on or before:* | 03 September 2026 |
| *Re-certification Due:* | 02 October 2027 |

This Certificate is property of ICI UK Ltd. and remains valid subject to satisfactory surveillance audits.

Peter Collins

Ex. Director

International Certification & Inspection UK Limited.

Kemp House, 160 City Road, London, EC1V 2NX, United Kingdom

ACCREDITATION BOARD FOR CERTIFICATION BODIES

ICI CERTIFIED

*To check validity of the certificate please visit at www.ici-uk.co*

This certification of registration is issued by International Certification & Inspection UK Limited accredited with Accreditation Board For Certification bodies (www.ab-cb.org). This certificate remains the property of International Certification & Inspection UK Limited and must be returned upon request.

## -: पारदर्शकता व तंत्रज्ञान :-

### -: संगणक अज्ञावलींचा वापर :-

- आमचं गाव आमचा विकास आराखडा (GPDP) प्लॅन प्लस मध्ये अपलोड केलेला आहे.

* आपलं सरकार सेवा अंतर्गत ई-पंचायत कार्यक्रमांतर्गत NIC च्या 11 अज्ञावली

* डाटा फिंडीगइन ऐरीया प्रोफाईलर
* डाटा फिडींग इन असेट डायरेक्टरी
* लोकल गव्हरमेंन्ट डायरेक्टरी
* डाटा फिडींग इन प्लॅन प्लस
* सोशल ऑडीट
* नॅशनल पंचायत पोर्टल
*सर्वीस प्लस
* ॲक्शन सॉप्ट
* ट्रेनींग मॅनेजमेंट पोर्टल
* बेसीक जी आय एस सॉप्टवेअर
* ईग्रामसॉफ्ट मध्ये सर्व नोंदी आद्ययावत करण्यात आलेले

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

- विशेष गौरव - **तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरे जी** यांनी कोरोना काळात गाव कोरोना मुक्त ठेवल्या बद्दल व गाव लातूर जिल्ह्यात सर्व प्रथम १००% लसीकरण केल्या बद्दल व नावीन्य पूर्ण उपक्रम राबवल्या बद्दल राज्यातील सरपंच संवाद कार्यक्रमात दुरदर्षप्रणाली (VC) कार्यक्रमात महिला सरपंचाचे कौतुक.
- राज्याचा पहिला 1 कोटी 75 लक्ष रुपयाचा पहिला पायलट प्रोजेक्ट मूलभूत सुविधेसह राबवून भटक्या जाती जमातील 44 लाभार्थ्यांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसात घरकुल योजना राबवलेली ग्रामपंचायत.
- सिकंदरपूर गावात दारू-बंदी सह विविध नावीन्य पूर्ण उपक्रम राबवून महिलांना सन्मान केल्या बद्दल **“राज्यस्तरीय महात्मा फुले समाज रत्न”** पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते पुरकार देऊन सन्मानित करण्यात आले.
- ग्रामपंचायत सिकंदरपूरच्या महिला सरपंचांस **“रयत प्रतिष्ठान महाराष्ट्राच्या”** वतीने जिल्हास्तरीय मानाच्या **ग्रामरत्न पुरस्काराने** मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.
- २५ महीला बचत गटाची स्थापना करुन त्याच्या रोजगार निर्मितीसाठी गावातच महीला बचत गटाची जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत प्रशिक्षण घेण्यात आले..
- गावातील कचरा व्यवस्थापन करण्यासाठी घंटागाडीची सुरुवात.
- पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी १२७६ मिया वाकी वृक्ष लागवड.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

- जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पाचवी वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी लोक सहभागातून डेक्स, प्रोजेक्टर सह डिजिटल शाळा केली.
- गावातील मुख्य रस्त्यावर बिहार पॅटर्न नुसार ८०० नारळाची लागवड करण्यात आली.
- शेतकर-यांच्या बांधावर ९०० फळांच्या वृक्षाची लागवड करण्यात आली.
- २०२१ ते २०२३ या दोन वर्षात 3 कोटी रुपयांची विकास कामे.
- जनसुविधा, लोकसहभाग, रोजगार हमी योजनेतून सुसज्ज अत्याधुनिक ग्रामसंसद भवन निर्माण.
- तीन वर्षात ११२ निराधार, विधवा, अपंग लोकांसाठी श्रावण बाळ योजनेतून मानधन.
- तीन वर्षात ४४ घरकुल मंजूर.
- रोजगार हमी योजनेतून शेतकर-यासाठी ३० गायीचे गोठे दुधाळ गट कडबा कुट्टी, बायोगॅस प्रकल्प राबवलेली ग्रामपंचायत.
- रोजगार हमी योजनेतून 20 शेतकऱ्यांना सिचंन विहीर मंजूर करून फळबाग लागवड करून यस्वी केलेली ग्रामपंचायत.
- गावातील महीला व पुरुषांचे मोफत शरीर तपासणी करून आरोग्य तंदुरुस्त ठेवणारी ग्रामपंचायत.
- रोजगार हमी योजनेतून तीन वर्षात १५ किलोमीटर शिव रस्ते मजबुतीकरण, खाडिकरण करणारी ग्रामपंचायत.
- जल जिवन जल मिशन अंतर्गत १ कोटी ३५ लक्ष रुपयांची पाणी पुरवठा योजना राबवणारी ग्रामपंचायत.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

- नवीन विस्तारित वस्ती मध्ये खडीकरण, मजबुती करण, पेवर ब्लॉक रस्ते व नाली बांधकाम करणारी ग्रामपंचायत.
- लोकसहभागातुन सुसज्ज सभागृह बांधणारी ग्रामपंचायत.
- लोकसहभागातून हनुमान मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर ३१ फुट, २५ फुट शिखर बांधकाम करणारी ग्रामपंचायत.
- लोक सहभागातून सती अनुसया माता मंदिर व २१ फुट शिखर निर्माण.
- आरोग्य, शिक्षण, स्वच्छते वर विशेष काम करणारी ग्रामपंचायत.
- जेष्ठ नागरिकासाठी विरंगुळा केंद्र.
- देशसेवा बजावून आलेल्या सैनिकांचे पाद्यपूजा करुन परिवाराचा सन्मान करणारी ग्रामपंचायत.
- सर्व महिलांना मकर संक्रांतीला डस्टबिन, झाडू, वृक्ष देवून स्वच्छतेचे वान लुटनारी ग्रामपंचायत.
- १००% कर वसुली करणारी ग्रामपंचायत.
- गावातील घन कचरा व्यवस्थापन करण्यासाठी घंटागाडी मार्फत ओला कचरा व सुका कचरा विघटीकरण करणारी ग्रामपंचायत.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

- पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी १२७६ मियावाकी वृक्ष लागवड करणारी ग्रामपंचायत.
- बिहार पॅटर्न नुसार ८०० नारळाची लागवड करणारी ग्रामपंचायत.
- शेतकर-यांच्या बांधावर ९०० फळांच्या वृक्षाची लागवड करणारी ग्रामपंचायत.
- जि. प. शाळा, सार्वजनिक मंदिर, अंगणवाडी ग्रामपंचायत येथे रेन हार्वेस्टिंग करनारी ग्रामपंचायत.
- इ. सं. २०२१ ते २०२३ या वर्षात ३ कोटी रुपयांची विकास कामे करणारी ग्रामपंचायत.
- लोकसहभाग, ग्रामनिधी, जनसुविधा तथा रोजगार हमी योजनेतून नवीन अद्यावत सुसज्ज संगणीकृत **"ग्राम संसद भवनची"** निर्मिती.
- तीन वर्षात ११२ निराधार, विधवा, अपंग लोकांसाठी सं.गा. यो. इ.गा.यो. योजनेतून मानधन मंजूर.
- तीन वर्षात प्रधान मंत्री घरकुल योजना व रमाई घरकुल योजनेतून ४४ घरकुल मंजूर करून घेतलेली ग्रामपंचायत.
- सिकंदरपूर गावात व वडार वस्ती येथे जल जिवन जल मिशन अंतर्गत १ कोटी ३५ लक्ष रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर करून घेतली.
- विस्तारित वस्ती मध्ये नवीन खडीकरण, मजबुतीकरण, पेवर ब्लॉक रस्ते व नाली बांधकाम.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

- माजी वैदिकीय मंत्री, आमदार अमित विलासरावजी देशमुख साहेब यांच्या आमदार निधीतून हनुमान मंदिरासमोर सुसज्ज सभागृहाची निर्मिती.
- लोकसहभागातून हनुमान मंदिर ३५ फूट व विठ्ठल रुक्मिणी मंदिर ३१ फुट शिखर बांधकाम पूर्ण केले.
- लोक सहभागातून सती अनुसया माता मंदिराचा जीर्णोद्धार व २१ फुट शिखर निर्माण.
- आरोग्य, शिक्षण, स्वच्छते वर विशेष लक्ष देणारी ग्रामपंचायत.
- सिकंदरपूर येथील गरीब परिवारात जगावातील जेष्ठ नागरिकासाठी विरंगुळा केंद्राची निर्मिती करून जेष्ठाचा सन्मान कणारी ग्रामपंचायत.
- गावात जन्मलेल्या मुलींना लेक वाचवा लेक शिकवा अभियानातून मदत.
- देशसेवा बजावून आलेल्या गावातील सैनिकांची भव्य मिरवणूक काढून पाद्यपूजन करत त्यांचा व परिवाराचा सन्मान करण्यात आला.
- इ. स.२०२२-२३ वर्षात सिकंदरपूर येथे १००% कर वसुली केल्या बद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल व पंचायत समिती लातूरचे गट विकास अधिकारी तुकाराम भालके यांच्या कडून सन्मान पत्र देऊन सन्मान केला.
- सरपंच सौ. रेशमा माधव गंभीरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील १०५ विध्यार्थ्यांना स्पोर्ट गणवेश वाटप करून वाढदिवस साजरा केला.

# ग्राम पंचायत कार्यालय, सिकंदपूर

ता. लातूर जि. लातूर




हात धुवा प्रात्यक्षिक




स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२३

**लोकपत्र**

# देशसेवा बजावुन स्वगृही परतलेल्या भारत मातेच्या सैनिकाचा पाद्यपूजा करुन केला सन्मान!

## सिकंदरपूर ग्रामपंचायतीचा आणखी एक नाविन्यपूर्ण उपक्रम!



**लातूर/प्रतिनिधी**

भारतमातेची अठरा वर्ष सेवा पुर्ण करुन स्वगृही परतलेल्या सेवा निवृत्त सैनिक जावायाची गावात वाजत, गाजत भव्य मिरवणूक काढुन मायेची शाल, राधा-कृष्ण मुर्ती, वडाचे झाड, श्रीफळ व हार घालून सन्मान केला.

कार्यक्रमाच्या सुरवातीला सेवानिवृत्त सैनिक नामदेव शिवाजी वीर त्यांची माता, गावचे दिवंगत माजी सैनिक नागोराव गंभीरे यांच्या पत्नी, दुसरे दिवंगत सेवा निवृत्त सैनिक बाबासाहेब जाधव यांच्या पत्नी तसेच सेवा निवृत्त सैनिक सुग्रीव निळकंठ गंभीरे यांचे पाद्यपूजन करुन यथोचित सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या प्रथम नागरिक उपकृमशील सरपंच सौ. रेशमा माधव गंभीरे होत्या. व्यासपिठावर सैनिक संघटनेचे जिल्हा पदाधिकारी व सेवानिवृत्त सैनिक व त्यांच्या पत्नी विराजमान होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक कॉंग्रेसचे जिल्हा अध्यक्ष केशव गंभीरे यांनी केले तर सुत्रसंचालन आदर्श शिक्षिका मंदाकिनी गंभीरे-भालके यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी संजय घाडगे यांनी मानले. या कार्यक्रमास उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उद्धव पाटील, गजानन बोयणे, सौ. मंजुषा गोपाळ सुरवसे, सौ. बाळुबाई सुरेश इटकर, सौ. रामुबाई सुरेश लष्करे, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष ज्योतीराम कदम, उपाध्यक्ष रोहित काकासाहेब गंभीरे, पाणी पुरवठा स्वच्छता समितीचे अध्यक्ष तानाजी कोकाटे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा कल्पना ज्योतीराम गंभीरे, उपाध्यक्ष अशोक ताटे नेहरू युवा मंडळाचे अध्यक्ष सदस्य, शिवभक्त मित्र मंडळाचे पदाधिकारी, तुळजाई मित्र मंडळाच्या पदाधिकार-यासह बहुसंख्येने ग्रामस्थ, महीला, व तरुण, तरुणी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी काकासाहेब गंभीरे, मारुती गंभीरे,दिलीप गंभीरे,श्रीराम गंभीरे, उमाकांत गंभीरे, मोहन गंभीरे, बाळासाहेब गंभीरे, नामदेव गंभीरे,महेश गंभीरे, पांडुरंग ताटे, गहिनीनाथ बोयणे, दिगंबर कदम, रतेश्वर लाळे, भास्कर गरगट्टे, सत्तार शेख, रोहन गंभीरे, अक्षय लाळे यांनी परिश्रम घेतले.

# ग्राम पंचायत कार्यालय, सिकंदपूर

ता. लातूर जि. लातूर




**संचार**

## जिल्हास्तरीय ग्रामरत्न पुरस्काराने सरपंच रेशमा गंभीरे सन्मानित

**संचार प्रतिनिधी**

**लातूर , दि.४ -** रयत प्रतिष्ठानच्या पुरस्कार सोहळ्यात शहरापासून जवळच असलेल्या सिकंदरपूरच्या उपक्रमशिल सरपंच रेशमा गंभीरे यांना जिल्हास्तरीय ग्रामरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

येथील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामदास काळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गंभीरे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी पुण्याच्या 'यशदा'चे प्रवीण प्रशिक्षक माधव गंभीरे, उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दव गंभीरे, सुरेश इटकर, सुरेश लष्करे, ग्रामसेवक खंडू कलबुने, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे निमंत्रक दयानंद सुरवसे, ग्रामपंचायत कर्मचारी गहिणीनाथ बोयणे, दिगंबर कदम, प्रदीप पाटील उपस्थित होते. कोरोना काळातील उल्लेखनीय कामगिरी, दोन वर्षांत आरोग्य, शिक्षण, कृषी, पाणीपुरवठा, महिला सबलीकरण, बचतगट, मुलभूत घनकचरा व्यवस्थापनासाठी नियमित घंटागाडीच्या सुविधेसह नवीन ग्राम संसद भवन, जनावरांचे गोठे, सिंचन विहीर आदी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत गावचा चौफेर विकास साधत गावाची वाटचाल आदर्श गावच्या दिशेने घेऊन जात असल्याबद्दल सरपंच गंभीरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी मंचावर प्रतिष्ठानचे मार्गदर्शक सूर्यकांत लोखंडे, सुनीलकुमार डोपे, मार्गदर्शक ॲड. वैशाली लोंढे, राज्य सल्लागार संजय मोरे आदी उपस्थित होते.



लातूर : पद्मविभूषण डॉ. अशोक कुकडे यांच्या हस्ते रेशमा गंभीरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी अहिल्या गाठाळ, गजानन भातलवंडे, माधव गंभीरे, रामदास काळे व अन्य.



# ग्राम पंचायत कार्यालय, सिकंदपूर

ता. लातूर जि. लातूर



स्वच्छता शपथ घेताना ग्रामस्थ




कर वसूली मोहिम जनजागृती करताना सरपंच

# ग्राम पंचायत कार्यालय, सिकंदपूर

ता. लातूर जि. लातूर







**पुण्य नगरी**

## घनकचरा व्यवस्थापन करुन नववर्षाचे स्वागत

### सिकंदरपूर ग्रामपंचायतचा उपक्रम



**लातूर :** सरत्या २०२२ वर्षाला निरोप देत असताना नवीन २०२३ वर्षाचे स्वागत नाविन्यपूर्ण उपक्रमाने साजरा करीत सिकंदरपूर गाव व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी घरातील व परिसरातील कचरा व्यवस्थापन करण्यासाठी सिकंदरपूर ग्रामपंचायतने घंटागाडीचा शुभारंभ केला आहे.

सिकंदरपूरच्या उच्च विद्या विभूषित व उपक्रमशील सरपंच रेशमा माधव गंभीरे या गावात सतत नवनवे उपक्रम राबवत असतात. याचाच एक भाग म्हणून १ जानेवारी २०२३ रोजी सिकंदरपूर ग्रामस्थांना घंटागाडी ची भेट देत नववर्षाचे स्वागत केले. सिकंदरपूर हे गाव शहरापासून जवळचे गाव असल्याने कचऱ्याची समस्या शहराप्रमाणेच भेडसावयला सुरुवात झाली. प्लास्टीक पिशव्यांचा वापर व अपुऱ्या जागेमुळे ग्रामस्थ गटारीमध्येच प्लास्टीकयुक्त कचरा टाकत असल्याने या समस्येचा बंदोबस्त करण्यासाठी जन आधार सेवाभावी संस्थेशी करार करत गटारांची स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणीतील कचऱ्याचे व्यवस्थापन १ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता सरपंच रेशमा माधव गंभीरे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करुन व सफाई कामगारांचे औक्षण करत घंटागाडीस श्रीफळ वाढवून या मोहीमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी यशदाचे प्रवीण प्रशिक्षक माधव गंभीरे, उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दव गंभीरे, गजानन बोयणे, बाळुबाई इटकर, रामुबाई लष्करे, जन आधार सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष संजय कांबळे, सचिव सुरेश काळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीराम गंभीरे, उपाध्यक्ष अशोक ताटे, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष ज्योतीराम कदम, उपाध्यक्ष रोहीत गंभीरे, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष तानाजी कोकाटे, माजी उपसरपंच दिनकर गंभीरे, दिलीप गंभीरे, दगडू बिडवे, हभप विनायक गंभीरे, मारुती गंभीरे, श्रीमंत गरगट्टे, उस्मान शेख, काकासाहेब गंभीरे, राजाराम ताटे, उमाकांत गंभीरे, पांडूरंग ताटे, दिगंबर कदम, गहिनीनाथ बोयणे, रतेश्वर लाळे, भास्कर गरगट्टे, अंगणवाडी सेविका, मदतणीस, आशा कार्यकर्तीसह बचत गटाच्या महीला व पुरुष बहुसंख्येने उपस्थित होते.

Smart Latur Edition

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## भव्य ग्रामपंचायत भवन चे भव्य बांधकाम व विविध कार्यक्रमांचे आयोजन










# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## विविध विकास कामांची छायाचित्रे








# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## गणेशउत्सवानिमित्त गावातील चिमुकल्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन






# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## ग्रामपंचायत मार्फत उभा करण्यात आलेल्या विकास कामांची पाहणी करताना मा. उप-मु.का.अ.



**देशोन्नती**

# सिकंदरपूर येथील मियावाकी व नारळ वृक्ष लागवड मोहीम कौतुकास्पद-भालके

दि. १४ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी १२:३० वाजता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांनी सिकंदरपूर येथील जन सुविधा अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली. नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम, नवीन वस्ती विठ्ठलनगर येथील खडीकरण - मजबुतीकरण झालेले रस्ते, स्मशानभूमी येथील सुरु असलेल्या आर. सी. सी. कंपाऊंड वाल बांधकाम, सिकंदरपूर येथील स्मशानभूमीत १२७३ वृक्ष लागवड केलेली मियावाकीची पाहणी केली. पंधराव्या वित्त आयोगातून जि. प. शाळा व अंगणवाडीच्या विविध साहित्याचे वाटप करण्यात आले.

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** ■ लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांनी सिकंदरपूर येथील प्रगतीपथावर असलेल्या ग्रामपंचायत इमारत बांधकाम कामाची पाहणी केली. तसेच बिहार पॅटर्न पध्दतीने ३०० नारळ वृक्षाच्या लागवडीचा शुभारंभ करण्यात आला.

सिकंदरपूर येथील हनुमान मंदिरासमोरील सभागृह बांधकाम माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या स्थानिक विकास निधीमधून १० लक्ष रुपये मंजूर असून त्याचा शुभारंभ व जनसुविधेमधून पूर्ण झालेल्या कामाचा शुभारंभ आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. त्यांनी सिकंदरपूरच्या विविध विकासकामासाठी भरघोस निधी मंजूर केल्याबद्दल सरपंच रेशमा माधवराव गंभीरे यांनी त्यांचे विशेष आभार मानले.

दि. १४ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी १२:३० वाजता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके



यांनी सिकंदरपूर येथील जन सुविधा अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली. नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम, नवीन वस्ती विठ्ठलनगर येथील खडीकरण - मजबुतीकरण झालेले रस्ते, स्मशानभूमी येथील सुरु असलेल्या आर. सी. सी. कंपाऊंड वाल बांधकाम, सिकंदरपूर येथील स्मशानभूमीत १२७३ वृक्ष लागवड केलेली मियावाकीची पाहणी केली. पंधराव्या वित्त आयोगातून जि. प. शाळा व अंगणवाडीच्या विविध साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी सरपंच संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष माधव गंभीरे, सरपंच रेशमा माधवराव गंभीरे, उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दव गंभीरे, सुरेश इटकर, सुरेश लष्करे, पं. स.चे विस्तार अधिकारी नीलेश सोमाणी, बांधकाम विभागाचे अभियंता व्ही. बी. बिरादार, शिक्षक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष केशव गंभीरे, ग्रामविकास अधिकारी संजय घाडगे उपस्थित होते.

पाहणी झाल्यानंतर छोटेखानी कार्यक्रमात गटविकास अधिकारी तुकाराम भालके व मान्यवरांचा सत्कार सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह पांडुरंग ताटे, लक्ष्मण बोयणे, दिगंबर कदम, गहिनीनाथ बोयणे, महेश गंभीरे, भास्कर गरगट्टे यांनी केला. प्रास्ताविकात माधव गंभीरे यांनी ग्रामपंचायतच्या १७ महिन्यांच्या कार्यकाळात राबवलेल्या विविध उपक्रमांची व विकास कामाची माहिती दिली. सूत्रसंचालन रमेश आलापुरे यांनी केले तर आभार संजय घाडगे यांनी मानले. कार्यक्रमास जि.प. शाळेच्या मुख्याध्यापिका लिना स्वामी, आदर्श शिक्षक रमेश आलापुरे, विद्या गायकवाड, उपक्रमशील शिक्षिका संगीता कौडगी, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी मदतनीससह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

Deshonnati Edition
Sep 16, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## नाविण्यपुर्ण विशेष




**जिल्हा विकास समन्वय व संनियत्रण समिती (दिशा), बैठकीमध्ये मा खासदार महोदयांचे हस्ते 30 गोठे, व 2 नरेगातील रस्ते मंजूरीचे कार्यारंभ आदेश प्राप्त**

**मा. मंत्री महोदयांनी गावांमध्ये केलेल्या विकास कामांची पाहणी केली.**



# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## नाविण्यपुर्ण विशेष




**ग्रामस्थांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीरांची आयोजन**

**कोव्हीड काळांमध्ये गावात 100% लसीकरण मोहिम राबवली.**



# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## जिल्ह्यातील विविध कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती



देशोन्नती

# लातूर येथे आत्मनिर्भर ग्राम - सरपंच परिषद व सेंद्रिय शेती मार्गदर्शन कार्यशाळा उत्साहात

देशोन्नती वृत्तसंकलन...

लातूर ▬ राहिचंद्र मंगल कार्यालय, लातूर येथे रविवार, दिनांक १६ एप्रिल २०२३ रोजी सकाळी १०:३० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत लातूर जिल्ह्यातील सरपंचाची एकदिवसीय सरपंच परिषद उत्साहात झाली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन मेडिकल असोसिएशनचे उपाध्यक्ष, प्रसिद्ध छातीविकार व श्वसन विकार तज्ज्ञ डॉ. रमेश भराटे होते. प्रमुख मार्गदर्शक भारत विकास संगमचे संस्थापक बसवराज पाटील, कर्नाटक, पद्मश्री लक्ष्मणसिंह लापोडीया, राजस्थान, गोपालभाई सुतारीया, गुजरात, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, सरपंच सेवा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम घोगरे - पाटील, सामाजिक प्रबोधनकार अर्चना पखान, अमरावती, संयोजक तथा 'यशदा'चे प्रवीण प्रशिक्षक माधव गंभीरे, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष पंकज शेळके, 'यशदा' सत्र समन्वयक नीता मुळावकर, भारत विकास संघाचे अशोक टाकसाळे, महादेव गोमारे यांच्या हस्ते



दीप प्रज्वलन करुन तसेच सिकंदरपूरच्या सरपंच रेशमा माधवराव गंभीरे, वलांडीच्या सरपंच राणी भंडारे, महाराणा प्रताप नगरच्या सरपंच संगीता पतंगे यांच्या उपस्थितीत संयोजन समितीच्या हस्ते कुंडीतील वृक्षाचे पूजन करून व पाणी घालून सरपंच परिषदेची सुरुवात करण्यात आली. तद्नंतर संयोजन समितीच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष पंकज शेळके यांनी केले तर एकदिवसीय सरपंच परिषद आयोजित करण्यामागची भूमिका 'यशदा'चे प्रवीण प्रशिक्षक माधव गंभीरे यांनी मांडली. पहिल्या सत्रात मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, प्रबोधनकार अर्चना पखान, पद्मश्री लक्ष्मण सिंह लापोडीया, गोरक्षक संस्थापक गोपालभाई सुतारीया, सरपंच सेवा महासंघाचे अध्यक्ष राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श सरपंच पुरुषोत्तम घोगरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात चन्नबश्वेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, विजय वरुडकर, संजय पटेल, भारत विकास संगमचे संस्थापक प्रमुख मार्गदर्शक बसवराज पाटील यांनी ७७६ उपस्थित सरपंचाना सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप इंडियन मेडिकल असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. रमेश भराटे यांच्या मार्गदर्शनाने सरपंच परिषदेची सांगता झाली.प्रास्ताविक माधव गंभीरे यांनी केले तर आभार निता मुळावकर यांनी मानले. सूत्रसंचालन शिवाजी पवार यांनी केले.

Deshonnati Edition
Apr 18, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर




**महात्मा फुले समाजरत्न पुरस्कार मा. विक्रम काळे यांच्या हस्ते प्राप्त**

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## गावांची ग्रामसभा अत्यंत शांत व खेळीमेळीच्या वातावरणात चांगल्याप्रकारे संपन्न होतात






### सिकंदरपूर येथील ग्रामसभा खेळीमेळीत संपन्न

सिकंदरपूर : ७४ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त गावच्या प्रथम नागरीक सिकंदरपूरच्या सरपंच रेशमा गंभीरे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यानंतर स. १० वा. ग्रामपंचायत कार्यालय सिकंदरपूर येथे सरपंचांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

या ग्रामसभेत सुरुवातीला भारताच्या संविधानाच्या उद्देशिकाचे वाचन करुन गाव तंबाखू, बीडी, सिगारेट, दारु मुक्त करुन गाव आरोग्यदायी करण्यासाठी ग्रामस्थांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

या ग्रामसभेस उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दव गंभीरे, बाळुबाई इटकर, रामुबाई लष्करे, तंटामुक्ती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष सदस्य व ग्रामस्थ बहुसंख्ये उपस्थित होते.

प्रास्ताविकात ग्रामसभा प्रभारी सचिव रमेश आलापुरे यांनी सभेच्या विषय पत्रिकेचे वाचन केले.

अध्यक्षीय समारोपात सरपंच रेशमा गंभीरे यांनी जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या परीपत्रकाचे वाचन केले. आरोग्यदायी गाव, स्वच्छ गाव-हरीत गाव यावर काम करण्याचे ग्रामसभेत सांगितले. आरोग्यसेवक एस. बी. पवार यांनी कुष्ठरोग व टी. बी. निर्मुलन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.





# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## विविध विकास कामांची छायाचित्रे









# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## मेरी मिट्टी, मेरा देश











# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीमध्ये ग्रा. पं. सिकंदपूर येथे ग्रामसमृद्धीची गुडी अंतर्गत नरेगाचा भव्य कार्यक्रम संपन्न









# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुरस्कार






# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

75 आज़ादी का अमृत महोत्सव

## विविध वृत्तपत्रांनी ग्रामपंचायत मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामांची घेतलेल्या नोंदीचे कात्रणे.

**पुण्य नगरी**

### घनकचरा व्यवस्थापन करुन नववर्षाचे स्वागत

**सिकंदरपूर ग्रामपंचायतचा उपक्रम**



**लातूर :** सरत्या २०२२ वर्षाला निरोप देत असताना नवीन २०२३ वर्षाचे स्वागत नाविन्यपूर्ण उपक्रमाने साजरा करीत सिकंदरपूर गाव व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी घरातील व परिसरातील कचरा व्यवस्थापन करण्यासाठी सिकंदरपूर ग्रामपंचायतने घंटागाडीचा शुभारंभ केला आहे.

सिकंदरपूरच्या उच्च विद्या विभूषित व उपकृमशील सरपंच रेशमा माधव गंभीरे या गावात सतत नवनवे उपक्रम राबवत असतात. याचाच एक भाग म्हणून १ जानेवारी २०२३ रोजी सिकंदरपूर ग्रामस्थांना घंटागाडी ची भेट देत नववर्षाचे स्वागत केले. सिकंदरपूर हे गाव शहरापासून जवळचे गाव असल्याने कचऱ्याची समस्या शहराप्रमाणेच भेडसावायला सुरुवात झाली. प्लास्टीक पिशव्यांचा वापर व अपुऱ्या जागेमुळे ग्रामस्थ गटारीमध्येच प्लास्टीकयुक्त कचरा टाकत असल्याने या समस्येचा बंदोबस्त करण्यासाठी जन आधार सेवाभावी संस्थेशी करार करत गटारांची स्वच्छता, सार्वजनिक ठिकाणीतील कचऱ्याचे व्यवस्थापन १ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता सरपंच रेशमा माधव गंभीरे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करुन व सफाई कामगारांचे औक्षण करत घंटागाडीस श्रीफळ वाढवून या मोहीमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी यशदाचे प्रवीण प्रशिक्षक माधव गंभीरे, उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दव गंभीरे, गजानन बोयणे, बाळुबाई इटकर, रामुबाई लष्करे, जन आधार सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष संजय कांबळे, सचिव सुरेश काळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीराम गंभीरे, उपाध्यक्ष अशोक ताटे, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष ज्योतीराम कदम, उपाध्यक्ष रोहीत गंभीरे, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष तानाजी कोकाटे, माजी उपसरपंच दिनकर गंभीरे, दिलीप गंभीरे, दगडू बिडवे, हभप विनायक गंभीरे, मारुती गंभीरे, श्रीमंत गरगट्टे, उस्मान शेख, काकासाहेब गंभीरे, राजाराम ताटे, उमाकांत गंभीरे, पांडूरंग ताटे, दिगंबर कदम, गहिनीनाथ बोयणे, रतेश्वर लाळे, भास्कर गरगट्टे, अंगणवाडी सेविका, मदतणीस, आशा कार्यकर्तींसह बचत गटाच्या महीला व पुरुष बहुसंख्येने उपस्थित होते.

Smart Latur Edition

**पुण्य नगरी**



### सिकंदरपूरच्या महिलांकडून पर्यावरणपूरक संकल्पांच्या सप्तपदीने वटपोर्णिमा साजरी

**लातूर :** सिकंदपूरच्या उपक्रमशील सरपंच रेशमा गंभीरे यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरणपूरक संकल्पाची सप्तपदी घेत येथील महिलांनी वटपोर्णिमा साजरी केली.

यावेळी ७ वटवृक्षांचे रोपण करीत मी दरवर्षी एक झाड लावेल, मी लावलेल्या झाडाचे संरक्षण करीन, मी कधीच झाड तोडणार नाही, मी कागदाचा वापर काटकसरीने करेल, मी निसर्ग संरक्षणाचे महत्त्व सर्वांना सांगेन, मी प्लास्टिकच्या पिशव्या वापरणार नाही व मी पाण्याचे योग्य नियोजन करुन पाणी वाचवेल, असे ७ संकल्प सिकंदपूर येथील महिलांनी केला. संकल्पांच्या सप्तपदीने आगळ्यावेगळ्या पद्धतीने वटपोर्णिमा साजरी केलेला हा उपक्रम इतर गावांच्या महिलांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. या संकल्पात सरपंच, ग्रामपंचायत सदस्या, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, आशा कार्यकर्ती, महिला बचत गटाच्या सदस्या व बहुसंख्य महिलांनी सहभाग घेतला. माजी सरपंच माधव गंभिरे यांनी या उपक्रमाचे स्वागत केले. प्रत्येक गावातील महिलांनी असा संकल्प करून वृटपोर्णिमा साजरी केली असती तर लातूर जिल्ह्याचे वृक्षारोपण, संवर्धनाचे उद्दिष्ट देखील एका क्षणात पूर्णत्वाकडे गेले असते. महिला शक्ती काहीही करू शकते. त्यांनी ठरवल्यानंतर असे अनेक उद्दिष्ट एक झटक्यात पूर्ण होण्यास वेळ लागणार नाही. सिकंदरपूरचा हा उपक्रम खरोखरच इतरांना देखील शिकवून जाणारा आहे.

Smart Latur Edition
Jun 4, 2023 Page No. 2

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## विविध वृत्तपत्रांनी ग्रामपंचायत मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामांची घेतलेल्या नोंदीचे कात्रणे.

# देशोन्नती

आझादी का अमृत महोत्सवानिमित्त

## सिकंदरपूर येथे सव्वादोन लाखांची विक्रमी कर वसुली



लातूर ▪ दि.२४ डिसेंबर रोजी मौ.सिकंदरपूर येथे आझादी का अमृत महोत्सवानिमित्त लातूर जिल्हा परीषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून व लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शाम गोडभरले यांच्या मार्गदर्शनाखाली सिकंदपूरच्या उच्चविद्या विभूषित सरपंच रेशमा माधवराव गंभीरे यांच्या पुढाकारातून सिकंदरपूर गावात इतिहासात पहिल्यांदाच आज एक दिवसात नागरीकांनी २२२२२२ ( दोन लाख बावीस हजार दोनशे बावीस ) रुपयांचा विकृमी कर भरना केला.यावेळी माधव गंभीरे, गहीनीनाथ बोयणे, दिगंबर कदम, श्रीमंत गरगट्टे, पांडुरंग ताटे,महेश गंभीरे,भास्कर गरगट्टे ग्रामविकास अधिकारी संजय घाडगे यांनी परीश्रम घेतले.

Deshonnati Edition
Dec 25, 2021 Page No. 3
Powered by : eReleGo.com

पुरोगामी विचाराचे
# एकमत
page- 8
21 Jan 2023

## सिकंदरपूरच्या ग्रामपंचायत भवनचे काम मॉडल ठरणार

रो. ह.यो. उपसचिव संजना खोपडे ▪ ग्रामपंचायत भवन, बिहार पॅटर्न वृक्ष लागवडीची केली पहाणी

लातूर : प्रतिनिधी

लातूर तालुक्यातील सिकंदरपूर येथे जन सुविधा व मनरेगा मधुन पुर्णत्वास येत असलेल्या ग्रामपंचायत भवनचे काम मॉडल ठरणार, असे प्रतिपादन रोजगार हमी योजनेच्या उपसचिव सौ.संजना खोपड यांनी केले.



लातूर तालुक्यातील सिकंदरपूर येथे जन सुविधा व मनरेगा मधुन पुर्णत्वास येत असलेल्या ग्रामपंचायत भवनची पहाणी रोजगार हमी योजनेच्या उपसचिव सौ. संजना खोपडे, राज्य गुणवत्ता नियंत्रक राजेंद्र शहादे, रोहयो उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, लातूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी तुकाराम भालके-पाटील, मनरेगाचे गट विकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी आदींनी भेट दिली.

सिकंदरपूर येथे जन सुविधा १० लक्ष रुपये व मनरेगा १० लक्ष रुपये अभिसरण मधुन ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास आले असल्याचे सांगून उपसची खोपडे म्हणाल्या की, इमारतीचे काम दर्जेदार झाले आहे. आशा इमारती इतर गावात ही झाल्या पाहीजे, जेणेकरून मजुरांना गावातच रोजगार उपलब्ध होईल असे उद्गार काढले. यावेळी त्यांनी ग्रामपंचायत भवन व बिहार पॅटर्न वृक्ष लागवड इतर कामाची पाहणी केली.

यावेळी सरपंच सौ.रेशमाताई माधवराव गंभिरे, यशदाचे मास्टर ट्रेनर माधव गंभिरे, ग्रामपंचायत सदस्य उद्धव गंभिरे, मुख्याध्यापक रमेश आलापुरे, दिलीप गंभिरे, ग्रामसेवक कलबुर्गे के. बी., ग्रामरोजगार सेवक दिगंबर कदम, महेश गंभिरे, भास्कर गरगट्टे, गहिनीनाथ बोयणे व गावातील नागरिक उपस्थित होते.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## विविध वृत्तपत्रांनी ग्रामपंचायत मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामांची घेतलेल्या नोंदीचे कात्रणे.

# कोरोनामुक्तीच्या कामासाठी सिकंदरपूरच्या सरपंचाचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

लातूर / प्रतिनिधी

सिकंदरपूर (ता. लातूर) येथील सरपंच रेश्मा माधव गंभीरे यांनी गाव कोरोनामुक्त करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेऊन सरपंच गंभीरे यांनी कोरोना रुग्णांची माहिती तात्काळ होण्यासाठी गावात सुरू केलेल्या पुरुष व महिला व्हॅटस्‌ॲप ग्रुपचे विशेष कौतुक करून राज्यातील इतर ग्रामपंचायतींनी असा उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. आलमलाचे सरपंच कैलास निलंगेकर, सरवडीचे सरपंच बालाजी मोहिते हेही यावेळी उपस्थित होते.

सिकंदरपूरच्या सरपंच रेश्मा गंभीरे यांनी कोरोना प्रतिबंधासाठी गावात 'माझे कुटुंब माझे जबाबदारी मोहिमे'ची प्रभावी अंमलबजावणी केली. गावातील आशा कार्यकर्त्या व अँटी कोरोना फोर्सच्या सदस्यांना सोबत घेऊन गावातील प्रत्येक घरोघरी जाऊन कोरोना प्रतिबंधाच्या उपाययोजनांची माहिती देऊन त्यांचे प्रबोधन केले. गावातील निराधार, अपंग, विधवांना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सहकार्याने त्यांचे अनुदान त्यांना घरपोच दिले. त्यामुळे गर्दी टाळण्यात यश आले.

सिकंदरपूर गावात एकाही व्यक्तीला कोरोना होऊ नये, यासाठी प्रयत्न करण्यात येत होते. जरी कोरोना झाला तरी माहिती तात्काळ मिळावी, यासाठी गावातील सर्व महिला व पुरुषांचे स्वतंत्र वॅटस्‌ॲप ग्रुप



तयार केले. ग्रुपच्या माध्यमातून आपल्या तसेच शेजारच्या कुटुंबात कोठेही संशयित रुग्ण आढळल्यास त्याची तात्काळ माहिती द्यावी, असे कळविण्यात आले. ही माहिती मिळाल्यानंतर तात्काळ संबंधित रुग्णावर योग्य ते उपचार करून त्यांना अलगीकरणात ठेवण्यात आले. ग्रुपमुळे कोरोना रुग्णांची तात्काळ माहिती मिळत असल्याने व त्यांच्यावर आरोग्य विभागामार्फत तात्काळ उपचार करणे शक्य झाल्याने आज गाव पूर्णपणे कोरोनामुक्त झाल्याची माहिती सरपंच गंभीरे यांनी मुख्यमंत्र्यांना दिली.

गावात स्वच्छता मोहिम राबवून गाव व गावातील रस्ते पूर्णपणे स्वच्छ केले. गावात फवारण्या केल्या. सर्व कुटुंबांना मास्क, सानिटायझरचे वाटप ग्रामपंचायतीच्या वतीने केले. गावाची लोकसंख्या १ हजार ८३६ असून ४५ वर्षावरील ४१६ नागरिक आहेत. गावातील ९५ टक्के लोकांचे लसीकरण केले. सुरुवातीच्या काळात लसीकरणाला गावातून प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे माझी सासू, सासरे वयस्कर असून त्यांना बीपी व शुगरचा त्रास आहे.त्यांना प्रथम लस दिली. त्यानंतर प्रत्येकाने लस घ्यावी, असे आवाहन केले. त्यामुळे आज जवळपास ४५ टक्के लसीकरण झाले, असे सरपंच गंभीरे म्हणाल्या. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गावातील प्रत्येकाच्या घरी ग्रामपंचायतीच्या वतीने » पान २ वर

लोकमत

# कोरोनामुक्तीसाठी व्हॉटस्‌ॲप ग्रुप; मुख्यमंत्र्यांकडून सिकंदरपूरचे कौतुक

### अन्य ग्रामपंचायतींनी सिकंदरपूरचा उपक्रम राबविण्याचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**लातूर :** सिकंदरपूर (ता. लातूर) येथील सरपंच रेश्मा माधवराव गंभिरे यांनी गाव कोरोनामुक्त राहावे, यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतली. सरपंच गंभिरे यांनी कोरोना रुग्णांची माहिती तत्काळ होण्यासाठी गावात सुरू केलेल्या पुरुष व महिला व्हॉटस्‌ॲप ग्रुप या अभिनव उपक्रमाच्या कामाचे विशेष कौतुक करून राज्यातील इतर ग्रामपंचायतींनीही असा उपक्रम राबविण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

सिकंदरपूरच्या सरपंच गंभिरे यांनी कोरोना प्रतिबंधासाठी गावामध्ये 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी केली. गावातील आशा कार्यकर्त्या व ॲन्टी कोरोना फोर्सचे सदस्य यांना सोबत घेऊन गावातील प्रत्येक घरोघरी जाऊन कोरोना प्रतिबंधाच्या उपाययोजनांची माहिती देऊन त्यांचे प्रबोधन करण्यात आले. त्याप्रमाणेच गावातील निराधार, अपंग, विधवा लाभार्थ्यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सहकार्याने त्यांचे अनुदान घरपोच वाटण्यात आले. त्यामुळे गर्दी टाळण्याला यश मिळून संसर्ग होण्यास अटकाव करण्यात आला, अशी माहिती त्यांनी दिली.

### माहिती मिळाल्याने तत्काळ उपचार करणे शक्य

- सिकंदरपूर गावात एकाही व्यक्तीला कोरोना होऊ नये, यासाठी प्रयत्न करण्यात येत होते. जरी कोरोना झाला तरी कोरोना रुग्णांची माहिती तत्काळ मिळावी, यासाठी गावातील सर्व महिला व पुरुष यांचे स्वतंत्र व्हॉटस्‌ॲप ग्रुप तयार करण्यात आले व या ग्रुपच्या माध्यमातून आपल्या तसेच शेजारच्या कुटुंबात कोठेही संशयित रुग्ण आढळल्यास त्याची तत्काळ माहिती द्यावी, असे कळविण्यात आले.
- ही माहिती मिळाल्यानंतर तत्काळ संबंधित रुग्णांवर योग्य ते उपचार करून त्यांना अलगीकरणात ठेवण्यात आले. या व्हॉटस्‌ॲप ग्रुपमुळे कोरोना रुग्णांची त्वरित माहिती मिळत असल्याने त्यांच्यावर तत्काळ उपचार करणे शक्य झाले. त्यामुळे आज गाव पूर्णपणे कोरोनामुक्त झाल्याची माहिती सरपंच गंभिरे यांनी मुख्यमंत्र्यांना दिली.

Aurangabad Main
Page No. 2 Jun 12, 2021
Powered by: erelego.com

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## विविध वृत्तपत्रांनी ग्रामपंचायत मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामांची घेतलेल्या नोंदीचे कात्रणे.

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
13 Oct 2022

### देशसेवा बजावून स्वगृही परतलेल्या सैनिकाचा पाद्यपूजा करुन सन्मान

लातूर : प्रतिनिधी

भारतमातेची अठरा वर्ष सेवा पुर्ण करुन स्वगृही परतलेल्या सेवा निवृत्त सैनिक जावायाची गावात वाजत, गाजत मिरवणूक काढुन मायेची शाल, राधा-कृष्ण मुर्ती, वडाचे झाड, श्रीफळ व हार घालून सन्मान केला.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपक्रमशील सरपंच सौ. रेशमा माधव गंभीरे होत्या. कार्यक्रमास उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उद्धव पाटील, गजानन बोयणे, सौ. मंजुषा गोपाळ सुरवसे, सौ. बाळुबाई सुरेश इटकर, सौ. रामुबाई लष्करे, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष ज्योतीराम कदम, उपाध्यक्ष रोहित गंभीरे, पाणी पुरवठा स्वच्छता समितीचे अध्यक्ष तानाजी कोकाटे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा कल्पना गंभीरे, उपाध्यक्ष अशोक ताटे उपस्थित होते.

यावेळी सेवानिवृत्त सैनिक नामदेव शिवाजी वीर त्यांची माता, गावचे दिवंगत माजी सैनिक नागोराव गंभीरे यांच्या पत्नी, दुसरे दिवंगत सेवा निवृत्त सैनिक बाबासाहेब जाधव यांच्या पत्नी, सेवा निवृत्त सैनिक सुग्रीव निळकंठ गंभीरे यांचे पाद्यपूजन करुन यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केशव गंभीरे यांनी केले. मंदाकिनी गंभीरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी संजय घाडगे यांनी मानले.

यावेळी काकासाहेब गंभीरे, मारुती गंभीरे, दिलीप गंभीरे, श्रीराम गंभीरे, उमाकांत गंभीरे, मोहन गंभीरे, बाळासाहेब गंभीरे, नामदेव गंभीरे, महेश गंभीरे, पांडुरंग ताटे, गहिनीनाथ बोयणे, दिगंबर कदम, रतेश्वर लाळे, भास्कर गरगट्टे, सत्तार शेख, अजय गंभीरे, रोहन गंभीरे, अक्षय लाळे आदी उपस्थित होते.

देशोन्नती

### सिकंदरपूर येथे जागतिक महिलादिन उत्साहात साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

लातूर ■ ८ मार्च जागतिक महिलादिनानिमित्त सिकंदरपूर येथे जागतिक महिलादिन विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.




सर्व प्रथम स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायतच्या वतीने पाणी, स्वच्छता व घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन करण्यासाठी प्रभात फेरी काढून जनजागृती करण्यात आली.

या प्रभात फेरीत सरपंच रेशमा माधवराव गंभीरे, उपसरपंच पिराजी इटकर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा मिना गंभीरे, उपाध्यक्ष अशोक ताटे, ग्रामपंचायत सदस्य उध्दव माधवराव गंभीरे, बाळूबाई सुरेश इटकर, रामूबाई सुरेश लष्करे, मुख्याध्यापिका लिना स्वामी, आदर्श शिक्षक रमेश आलापुरे सह ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तद्नंतर कोविड मध्ये काम करणाऱ्या आशा कार्यकर्ती, अंगणवाडी कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका व महीला बचत गटातील उत्कृष्ट काम करणाऱ्या महीलांचा सन्मान करण्यात आला.

Deshonnati Edition
Mar 10, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## विविध वृत्तपत्रांनी ग्रामपंचायत मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामांची घेतलेल्या नोंदीचे कात्रणे.

# सिकंदरपूर येथे लसीकरण मोहीम १०० % पूर्ण





**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्ह्यातील सिकंदरपूर हे गाव लातूर शहरालगत असून येथील कोविड लसीकरण मोहीम शंभर टक्के यशस्वी झाली आहे. कोरोणा महामारीने देशासह राज्यात थैमान घातले असताना त्याची पुसटशी झळ सिकंदरपूरला ही बसली गावचे ग्रामस्थ पण लातूर शहरात कामानिमित्त वास्तवास असलेल्या दोन नागरीकांना कोरोनाची लागण झाली व त्यात त्यांचे निधन झाले. त्याच दिवशी सिकंदरपूर ग्रामपंचायत ने निर्णय घेतला या पुढे कोरोनाला सिकंदरपूर हद्दी वर रोखायचं व गावात शंभर टक्के लसीकरण करायचं असा निर्णय उच्चविद्याविभुषित नवनिर्वाचित सरपंच रेशमा माधवराव गंभीरे यांनी घेतला.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी माझे कुटुंब माझी जबाबदारी ही संकल्पना संबंध राज्यात राबवत असताना सिकंदरपूर येथे मात्र लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख, जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी., जि.प.चे मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली माझे गाव माझी जबाबदारी ही संकल्पना राबवून ०२ एप्रिल २०२१ रोजी सरपंच सेवा महासंघाचे राज्य कार्याध्यक्ष माधव दादा गंभीरे यांच्या वाढदिवसानिमित्त ४५ + जेष्ठ नागरिकांना आरोग्य केंद्र गंगापूर व आरोग्य केंद्र बाभळगाव येथे स्वखर्चाने वाहनांची व्यवस्था करुन १४५ नागरीकांचे लसीकरण करुन घेतले.

लसीकरणाबद्दल नागरीकांच्या मनात प्रचंड भिती होती पण सर्वांना लसीकरणाचे महत्व पटवून सांगून मोहीमेस सुरुवात केली व केवळ एक महिन्यात ४५ + चे १००% उद्दिष्ट पुर्ण केले.

लसीकरण मोहीम सुरु असतांनाच गावातील गटारांची साफसफाई, गावात स्वच्छता ठेवण्यावर भर दिला. तसेच ' हायपोक्लोराईड ' व ' प्रायराथ्रीन ' ची धूर फवारणी वारंवार करुन गावात कोरोणा येवू नये म्हणून लातूर शहर हद्दी वर रोखण्यास ग्रामपंचायतीला यश आले.

गावात आरोग्य केंद्र, उप केंद्र नसताना ही पालकमंत्री यांच्या पुढाकाराने गावातच ल[...] उपलब्ध करून घेतली. मिशन कवच कुंडल व [...] घर दस्तक च्या माध्यमातून प्रत्येक नागरीकां[...] घरोघरी जावून लसीकरणाचे महत्व पटवून दे[...] ही लसीकरण मोहीम यशस्वी केली.

या मोहिमेत सरपंच रेशमा माधव[...] गंभीरे, उपसरपंच पिराजी इटकर, माजी सरप[...] बंकटराव देशमुख, सर्व ग्रामपंचायत सदस[...] ग्रामविकास अधिकारी संजय घाडगे, वैद्यकी[...] अधिकारी पी.पी.इगे, समुदाय आरोग्य अधिका[...] डॉ.चंद्रशेखर जाधव, आरोग्य सेवक एस.बी.पवा[...] आरोग्यसेविका के.डी.नरहारे, शिक्षक आला[...] आर.एल.,गंभीरे के.एस., संगणक ऑपरेटर मह[...] गंभीरे, आशा कार्यकर्ती देवनंदा बोयणे, मं[...] बोकने, ग्रामपंचायत सेवक भास्कर गस्ग[...] ग्रामरोजगार सेवक दिगंबर कदम यांनी परीश्[...] घेतले.

> **सिकंदरपूर येथे आरोग्य केंद्र अथवा उपकेंद्र नसताना अवघड वाटणारी लसीकरण मोहीम राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री ना. अमित देशमुख यांच्या मदतीने गावात लस उपलब्ध करुन घेवून व नागरीकांच्या घरोघरी जावून कोविड लसीचे महत्व पटवून देवून आरोग्य विभाग, ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य तथा आशा कार्यकर्ती शिक्षक, ग्रामस्थ यांच्या सामुहीक प्रयत्नाने कोविड लसीकरण मोहीम शंभर टक्के यशस्वी करु शकले.**
>
> **- रेशमा माधवराव गंभीरे, सरपंच सिकंदरपूर**

---

पुरोगामी विचाराचे
**एकमत**
page- 8
17 Nov 2022



# सिकंदरपूर येथे संपूर्ण आरोग्य तपासणी शिबिर

**१७६ जणांनी केली तपासणी**

**लातूर : प्रतिनिधी**

आरोग्य परिवार लातूर व ग्रामपंचायत सिकंदरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत संपूर्ण शरीर तपासणी व आहार मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. आरोग्यदायी गावची संकल्पना राबवण्यासाठी सिकंदरपूर येथे आरोग्य शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा उद्घाटन सरपंच सौ रेशमा माधवराव गंभिरे व माधव गंभिरे यांच्या संपूर्ण शरीराची तपासणी करुन करण्यात आले

यावेळी जागतिक आरोग्य सल्लागार हरिमामा सोनवणे, मंगल सोनवणे, आरोग्य सल्लागार ज्ञानेश्वरी भताने, वैशालीताई मुमाने, सोनु राऊत, आरोग्य वेलनेस कोच प्रमोद बन, रंजनाताई पुरी, सौरभ कुलकर्णी, माजी सरपंच बंकटराव देशमुख, उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दव पाटील, बाळुबाई इटकर, रामुबाई लष्करे, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष ज्योतीराम कदम, ग्रामविकास अधिकारी संजय घाडगे, राजकुमार अडसुळे, महेश गंभिरे तसेच महीला व ग्रामस्थ, तसेच तरुण मंडळी बहुसंख्येने उपस्थित होते.

या शिबिरात १७६ महीला व पुरुषांचे मोफत शरीर तपासणी करण्यात आली. या आरोग्य शिबिरात जागतिक आरोग्य सल्लागार हरीमामा सोनवणे व मंगल सोनवणे, आरोग्य सल्लागार वैशाली मुमाने, प्रमोद बन यांनी व्यसनमुक्ती, बललेली आहार शैली, आरोग्य, जिवनमान, महीला समस्या, योगा, वर्कआउट बद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात सरपंच रेशमा गंभिरे यांनी आरोग्य शिबिरा बद्दलची भूमिका मांडुन ग्रामस्थांच्या मदतीने आमचे गाव आरोग्यदायी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मान्यवरांना अश्वासीत केले.

या आरोग्य शिबिरात महीला, पुरुषासह तरुणांची बहुसंख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात यशदाचे प्रवीण प्रशिक्षक माधव गंभिरे यांनी केंद्र सरकार व राज्य सरकारने आमचा गाव आमचा विकास अंतर्गत शाश्वत विकास ध्येयांच्या ९ संकल्पनावर काम करण्याचे ठरवले आहे.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## विविध वृत्तपत्रांनी ग्रामपंचायत मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामांची घेतलेल्या नोंदीचे कात्रणे.

सकाळ

### स्वयंसहाय्यता समूहाचे जनजागर शिबिर

लातूर, ता. २२ (बातमीदार) : सिकंदरपूर (ता. लातूर) येथील सरपंच रेश्मा माधवराव गंभिरे यांच्या पुढाकारातून स्वंसहाय्यता समुहाचे एकदिवसीय जनजागर शिबिर सिकंदरपूर येथे घेण्यात आले. याला मोठा प्रतिसाद मिळाला.

भारतीय स्टेट बँक व ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदेत ता. १२ ते २१ आक्टोबर या कालावधीत दहा दिवसांचे मोफत निवासी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले होते. या शिबिरात शेळी पालन व दुग्धव्यवसायाबद्दल अठरा ते पंचेचाळीस वयोगटातील नागरीकांना प्रशिक्षण देण्यात आले. यात सिकंदरपूर येथील वीस महिला व सात युवकांनी सहभाग घेतला होता. पण गावातील इतर महिला व सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायाची माहिती व्हावी याकरीता सरपंच श्रीमती गंभिरे यांच्या पुढाकारातून एक दिवसाचे हे शिबिर घेण्यात आले.

या शिबिरात सतीश कांबळे यांनी दुग्धव्यवसाय, शेळीपालन, शिवणकाम, लघू उद्योग या विषयावर मार्गदर्शन केले. सुधाकर सुतार यांनी बँकिंग, उत्पादन, विक्री या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. या जनजागर शिबिरात प्रशिक्षण घेतलेल्या २७ महिला व पुरुषांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले.



लातूर : सिकंदरपूर येथे स्वयंसहाय्यता समुहाच्या शिबिरात प्रशिक्षणार्थींना सरपंच रेश्मा गंभिरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप झाले. यावेळी माधव गंभिरे, सुधाकर सुतार, सतीश कांबळे आदी.

गावातील महिलांना स्वयंपूर्ण करून गावातच रोजगार निर्मिती केली जाईल अशी ग्वाही सरपंच श्रीमती गंभिरे यांनी या कार्यक्रमात दिली. प्रास्ताविक माधव गंभिरे यांनी केले तर सूत्रसंचालन संदीप पुणेकर यांनी केले.

Aurangabad, Latur-Today
23/10/2021 Page No. 2

### सिकंदरपूर येथील ०२ आक्टोबरची ग्रामसभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न!



लातूर - सिकंदरपूर येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती सरपंच सौ. रेशमाताई माधवराव गंभीरे यांच्या हस्ते प्रतीमेच पुजन करुन साजरी करण्यात आली.

महात्मा गांधीनी भारत मातेला अस्वच्छते कडून स्वच्छतेकडे जाण्याचा दिलेला संदेश तरुण पिढींस आत्मसात व्हावा म्हणून सरपंच, उपसरपंच, सदस्य, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष व तरुण सदस्य यांनी गावातील मुख्य चौकाची झाडू मारुन साफसफाई केली. तद्नंतर ग्रामसभा संपर्क आधिकारी श्रीमती कलवले के. एस. यांच्या उपस्थितीत सरपंच सौ. रेशमा माधवराव गंभीरे यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ९:३० वाजता ग्रामसभा घेण्यात आली.

ग्रामसभेच्या सुरुवातीला उपस्थित ग्रामस्थांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. या ग्रामसभेत प्रधान मंत्री घरकुल आवास योजना समिती, पाणी पुरवठा समिती, सारथी समिती, ग्रामविकास कृषी समिती सह अन्य समिती गठीत करण्याचे ठराव बहुमताने पारीत करण्यात आले.

कोविड काळात सरपंचांनी केलेल्या कार्याचे कौतुक व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत केलेली दुरदृश्यय प्रणाली द्वारे चर्चा व मुख्यमंत्री ना. उद्धवजी ठाकरे साहेबांनी आपल्या महीला सरपंचाचे केलेले कौतुक या कौतूकामूळे सरपंचा सोबत सिकंदरपूरचे नाव राज्यभरात पोहचले

त्याबद्दल ग्रामसभेत सरपंच रेशमाताई माधव गंभीरे यांचा सत्कार करुन अभिनंदनाचा ठराव टाळ्यांच्या कडकडाटात बहुमताने मंजूर करण्यात आला.

तसेच महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे नुतन अध्यक्ष ज्योतीराम कदम यांचा सत्कार योगेश गंभीरे व विनोद सुरवसे- पाटील यांनी केला तर उपाध्यक्ष रोहीत गंभीरे यांचा सत्कार पांडुरंग ताटे मुख्तार शेख यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व फेटा बांधून करण्यात आला.

त्यानंतर प्रधान मंत्री घरकुल आवास योजनेचे नवनियुक्त अध्यक्ष गहीणीनाथ सोपान बोयणे यांचा सत्कार हणमंत गवळी व बंकट पवार यांनी शाल, श्रीफळ, पुष्पहार व फेटा बांधून केला.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## विविध वृत्तपत्रांनी ग्रामपंचायत मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामांची घेतलेल्या नोंदीचे कात्रणे.

देशोन्नती

### सिकंदरपूर येथील मियावाकी व नारळ वृक्ष लागवड मोहीम कौतुकास्पद-भालके

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** – लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांनी सिकंदरपूर येथील प्रगतीपथावर असलेल्या ग्रामपंचायत इमारत बांधकाम कामाची पाहणी केली. तसेच बिहार पॅटर्न पध्दतीने ३०० नारळ वृक्षाच्या लागवडीचा शुभारंभ करण्यात आला.

सिकंदरपूर येथील हनुमान मंदिरासमोरील सभागृह बांधकाम माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या स्थानिक विकास निधीमधून १० लक्ष रुपये मंजूर असून त्याचा शुभारंभ व जनसुविधेमधून पूर्ण झालेल्या कामाचा शुभारंभ आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. त्यांनी सिकंदरपूरच्या विविध विकासकामासाठी भरघोस निधी मंजूर केल्याबद्दल सरपंच रेशमा माधवराव गंभीरे यांनी त्यांचे विशेष आभार मानले.

दि. १४ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी १२:३० वाजता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांनी सिकंदरपूर येथील जन सुविधा अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली. नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम, नवीन वस्ती विठ्ठलनगर येथील खडीकरण - मजबुतीकरण झालेले रस्ते, स्मशानभूमी येथील सुरु असलेल्या आर. सी. सी. कंपाऊंड वाल बांधकाम, सिकंदरपूर येथील स्मशानभूमीत १२७३ वृक्ष लागवड केलेली मियावाकीची पाहणी केली. पंधराव्या वित्त आयोगातून जि. प. शाळा व अंगणवाडीच्या विविध साहित्याचे वाटप करण्यात आले.

दि. १४ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी १२:३० वाजता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांनी सिकंदरपूर येथील जन सुविधा अंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली. नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम, नवीन वस्ती विठ्ठलनगर येथील खडीकरण - मजबुतीकरण झालेले रस्ते, स्मशानभूमी येथील सुरु असलेल्या आर. सी. सी. कंपाऊंड वाल बांधकाम, सिकंदरपूर येथील स्मशानभूमीत १२७३ वृक्ष लागवड केलेली मियावाकीची पाहणी केली. पंधराव्या वित्त आयोगातून जि. प. शाळा व अंगणवाडीच्या विविध साहित्याचे वाटप करण्यात आले.



यावेळी सरपंच संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष माधव गंभीरे, सरपंच रेशमा माधवराव गंभीरे, उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दव गंभीरे, सुरेश इटकर, सुरेश लष्करे, पं. स.चे विस्तार अधिकारी नीलेश सोमाणी, बांधकाम विभागाचे अभियंता व्ही. बी. बिरादार, शिक्षक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष केशव गंभीरे, ग्रामविकास अधिकारी संजय घाडगे उपस्थित होते.

पाहणी झाल्यानंतर छोटेखानी कार्यक्रमात गटविकास अधिकारी तुकाराम भालके व मान्यवरांचा सत्कार सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्यांसह पांडुरंग ताटे, लक्ष्मण बोयणे, दिगंबर कदम, गहिनीनाथ बोयणे, महेश गंभीरे, भास्कर गरगट्टे यांनी केला. प्रास्ताविकात माधव गंभीरे यांनी ग्रामपंचायतच्या १७ महिन्यांच्या कार्यकाळात राबवलेल्या विविध उपक्रमांची व विकास कामाची माहिती दिली. सूत्रसंचालन रमेश आलापुरे यांनी केले तर आभार संजय घाडगे यांनी मानले. कार्यक्रमास जि.प. शाळेच्या मुख्याध्यापिका लिना स्वामी, आदर्श शिक्षक रमेश आलापुरे, विद्या गायकवाड, उपक्रमशील शिक्षिका संगीता कौडगी, अंगणवाडी कार्यकर्ती, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी मदतनीससह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

CMYK

Deshonnati Edition
Sep 16, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

पुरोगामी विचाराचे
लोकमत
page- 8
15 Sep 2022

### सिकंदरपूर येथे लम्पी स्कीन विषाणुजन्य आजार प्रतिबंधासाठी केली गोठा फवारणी

**लातूर : प्रतिनिधी**

लातूर तालुक्यातील सिकंदरपूर येथे सर्व पशुपालकांच्या गोठ्यात लम्पी स्कीन विषाणुजन्य प्रतिबंध औषधाची फवारणी श्रीराम अमृता गंभीरे व भालचंद्र अनुरथ जाधव यांच्या गोठ्यात फवारणी करुन मोहीमेची सुरुवात करण्यात आली.

लातूर जिल्ह्यामध्ये लम्पी स्कीन हा विषाणूजन्य आजार आला असून तो आजार नियंत्रणात आणण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल व लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांच्या सूचनेनुसार सिकंदरपूरच्या उपक्रमशील सरपंच सौ. रेश्मा माधवराव गंभिरे व कव्हा पशुवैद्यकीय केंद्राचे डॉ.डी. एस. खडबडे, व डॉ. एच. डी. कोळेकर यांच्या नियोजनाखाली सर्व पशुपालकांच्या ७७ गोठ्यांची फवारणी करण्यात आली.



सर्व प्रथम लम्पी स्कीन विषाणुजन्य आजाराची सविस्तर माहिती डॉ. कोळेकर यांनी दिली. सरपंच प्रतिनिधी माधव गंभिरे यांनी पशुपालकांनी घाबरून न जाता पशुधनाची योग्य खबरदारी घ्यावी असे आवाहन केले.

या वेळी माजी सरपंच बंकटराव देशमुख, माजी उपसरपंच दिनकर गंभिरे, ग्रामपंचायत सदस्य उध्दव गंभिरे, सुरेश इटकर, सुरेश लष्कर, श्रीराम गंभिरे, राजाभाऊ सुरवसे, शाहु सुरवसे, सुनील उगीले, गहिनीनाथ बोयणे, तुळशीराम लाळे, ज्योतीराम गंभीरे, मोहन गंभिरे, सलीम शेख, जिवन पवार, अशोक ताटे, सतीश जाधव, राजाराम ताटे, इमाम शेख सह ग्रामस्थ उपस्थित होते. फवारणीसाठी परिचर अंगद विठ्ठल सर्जे, गोविंद बक्के, भास्कर गरगट्टे, भैय्या गरगट्टे, धनंजय हंकारे यांनी परिश्रम घेतले.

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## विविध वृत्तपत्रांनी ग्रामपंचायत मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामांची घेतलेल्या नोंदीचे कात्रणे.

### सिकंदरपूर येथे कायदेविषयक जनजागृती शिबिर



लातूर ■ शहरापासून जवळच असलेल्या सिकंदरपूर येथील हनुमान मंदिर सभागृहात आज 'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत कायदेविषयक जनजागृती शिबिर पार पडले.

अध्यक्षस्थानी सिकंदरपूरच्या सरपंच रेशमा माधवराव गंभीरे होत्या. मुख्य मार्गदर्शक म्हणून लातूर विधी सेवा प्राधिकरणचे ॲड. आर. के. चव्हाण व ॲड. संतोष वाघमारे हे उपस्थित होते. मंचावर माजी सरपंच श्यामराव बळीराम गंभीरे, माजी सरपंच वेंकट पंढरीनाथ देशमुख, उपसरपंच पिराजी यलाप्पा इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दवराव माधवराव गंभीरे, बाळूबाई सुरेश इटकर, रामुबाई सुरेश लष्करे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्रीराम गंभीरे, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष ज्योतीराम कदम उपस्थित होते.

प्रास्ताविकात केशव गंभीरे यांनी कायद्यात राहून कसे काम करावे याबाबत मार्गदर्शन केले तर ॲड. आर. के. चव्हाण, ॲड. संतोष वाघमारे यांनी ज्येष्ठ नागरिकांचे अधिकार, बालकांना मोफत शिक्षण, महिलांचे हक्क या विषयांवर कायदेशीर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात सरपंच रेशमा गंभीरे यांनी, देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली असून लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे कायदेविषयक जनजागृती शिबिर ग्रामीण भागातील नागरिकांसाठी फलदायी ठरत असून या शिबिराचा लाभ सिकंदरपूर येथील ग्रामस्थ नक्कीच घेतील, असा विश्वास दिला. आभार ग्रामविकास अधिकारी संजय घाडगे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माधवराव गंभीरे, दिगंबर कदम, हनमंत गवळी, महेश गंभीरे, रतेश्वर लाळे, पांडुरंग ताटे, राजकुमार अडसूळे, अशोक ताटे, भास्कर गरगट्टे यांनी प्रयत्न केले.

ePaper देशोन्नती
Mon, 08 November 2021
https://deshonnati.digitaledition.in/c/64233359

देशोन्नती

### सिकंदरपूर येथे शिवस्वराज्याभिषेक महोत्सव उत्साहात साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...



लातूर ■ ६ जून १६७४ रोजी राजमाता जिजाऊ माँ साहेबांच्या अग्राहात्सव रयतेच्या जनकल्याणासाठी शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळा झाला आणि या सुदिनी महाराज छत्रपती झाले. म्हणून महाविकास आघाडी सरकारने ६ जून 'शिवराज्याभिषेक' दिवस शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्याचे जाहीर करुन गतवर्षी पासून त्याची अमंलबजावणी केली.

सोमवारी सकाळी ८.३० वाजता सिकंदरपूर ग्रामपंचायत कार्यालय येथे रांगोळी काढून शिवशक राजदंड, भगवा स्वराज्यध्वज, सुवर्णकलश, पुष्पहार, गाठी, आंब्याची डहाळी, घालून शिवशक राजदंड सजवून 'स्वराज्य' गुढी उभारुन मंगलमय वातावरणात गावच्या प्रथम नागरिक सरपंच रेशमा माधवराव गंभीरे यांच्या हस्ते शिवशक राजदंड ध्वज उभा करुन पूजन करण्यात आले. तद्नंतर महाराष्ट्र गीत व राष्ट्रगीतांचे गायन करण्यात आले.

या शिवस्वराज्य दिन सोहळयास माजी सरपंच माधव गंभीरे, उपसरपंच पिराजी इटकर, ग्रामपंचायत सदस्य उध्दवराव गंभीरे, सुरेश इटकर, सुरेश लष्करे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीराम गंभीरे, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष ज्योतीराम कदम, उपाध्यक्ष रोहीत गंभीरे, आदर्श शिक्षक रमेश आलापुरे, तंटामुक्त गाव समितीचे सदस्य उमाकांत गंभीरे, पांडुरंग ताटे, गहिनीनाथ बोयणे, रतेश्वर लाळे, राजकुमार अडसुळे, उस्मान शेख, अशोक ताटे, परमेश्वर शिंदे, महेश गंभीरे, भास्कर गरगट्टे, इमाम शेख, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, आशा कार्यकर्ती तथा ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

Deshonnati Edition
Jun 7, 2022 Page No. 2
Powered by : eReleGo.com

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

## विविध वृत्तपत्रांनी ग्रामपंचायत मार्फत केलेल्या उत्कृष्ट कामांची घेतलेल्या नोंदीचे कात्रणे.

### सिकंदरपुरच्या ग्रामपंचायतीची दुर्गंधी मुक्तीकडे वाटचाल

# गावात कचरा कुंडी व घंटा गाडीची सुरुवात करणार

देशोन्नती वृत्तसंकलन...

- ग्रामस्थांच्या सूचनेनुसार
- नूतन सरपंच रेश्मा गंभीरे यांच्या पुढाकारातून सफाईचे काम

सिकंदरपूर ■१४ मार्च २०२१ च्या ग्रामसभेतून आलेल्या विविध तक्रारीतून ग्रामस्थांनी सुचवलेल्या कामाची सुरुवात नुतन सरपंच रेशमा माधव गंभीरे उपसरपंच पिराजी यल्लापा इटकर व नुतन ग्रा. प. सदस्यांच्या पुढाकारातून विविध प्रलंबित कामाचा धडाका लावला असुन यांच्या पुढाकारातून गावातील नाले सफाईची सुरुवात झाली आहे. वर्ष भरापासून नाले सफाई झाली नसल्याने गावातील गटारे तुडुंब भरली होती व त्या मुळे गावात दुर्गंधी परसली होती त्या मुळे सर्वप्रथम नाले सफाईचे काम हाती घेऊन नाले सफाईचे काम युध्द पातळीवर सुरु आहे. पाणी फिल्टर दुरुस्ती, नालेसफाईचे काम होत असल्याने ग्रामस्थातून समाधान होत आहे. आता या नंतर दिवाबत्ती दुरुस्ती कडे लक्ष देणार असल्याचे ग्रा. प.सदस्य उध्दवराव माधवराव गंभीरे, बाळूबाई सुरेश इटकर, व रामुबाई सुरेश लष्करे यांनी आमच्या प्रतिनिधी शी सांगितले.

> वर्ष भरापासून नाले सफाई झाली नसल्याने गावातील गटारे तुडुंब भरली होती व त्या मुळे गावात दुर्गंधी परसली होती त्या मुळे सर्वप्रथम नाले सफाईचे काम हाती घेऊन नाले सफाईचे काम युध्द पातळीवर सुरु आहे.



**पुण्य नगरी**



# सिकंदरपूरच्या महिलांकडून पर्यावरणपूरक संकल्पांच्या सप्तपदीने वटपोर्णिमा साजरी

**लातूर :** सिकंदपूरच्या उपक्रमशील सरपंच रेशमा गंभीरे यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरणपूरक संकल्पाची सप्तपदी घेत येथील महिलांनी वटपोर्णिमा साजरी केली.

यावेळी ७ वटवृक्षांचे रोपण करीत मी दरवर्षी एक झाड लावेल, मी लावलेल्या झाडाचे संरक्षण करीन, मी कधीच झाड तोडणार नाही, मी कागदाचा वापर काटकसरीने करेल, मी निसर्ग संरक्षणाचे महत्त्व सर्वांना सांगेन, मी प्लास्टिकच्या पिशव्या वापरणार नाही व मी पाण्याचे योग्य नियोजन करुन पाणी वाचवेल, असे ७ संकल्प सिकंदपूर येथील महिलांनी केला. संकल्पांच्या सप्तपदीने आगळ्यावेगळ्या पद्धतीने वटपोर्णिमा साजरी केलेला हा उपक्रम इतर गावांच्या महिलांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. या संकल्पात सरपंच, ग्रामपंचायत सदस्या, अंगणवाडी कार्यकर्ती, मदतनीस, आशा कार्यकर्ती, महिला बचत गटाच्या सदस्या व बहुसंख्य महिलांनी सहभाग घेतला. माजी सरपंच माधव गंभिरे यांनी या उपक्रमाचे स्वागत केले. प्रत्येक गावातील महिलांनी असा संकल्प करून वृटपोर्णिमा साजरी केली असती तर लातूर जिल्ह्याचे वृक्षारोपण, संवर्धनाचे उद्दिष्ट देखील एका क्षणात पूर्णत्वाकडे गेले असते. महिला शक्ती काहीही करू शकते. त्यांनी ठरवल्यानंतर असे अनेक उद्दिष्ट एक झटक्यात पूर्ण होण्यास वेळ लागणार नाही. सिकंदरपूरचा हा उपक्रम खरोखरच इतरांना देखील शिकवून जाणारा आहे.

Smart Latur Edition
Jun 4, 2023 Page No. 2

# ग्रामपंचायत सिकंदरपूर, ता. जि. लातूर

आज़ादी का अमृत महोत्सव

## नाविण्यपुर्ण उपक्रमांची दैनिकात प्रकाशीत झालेल्या नोंदी

देशोन्नती

### विशेष कर वसुलीत सिकंदरपूर ग्रामपंचायतची पाच लाख रुपयांची विक्रमी वसुली

#### मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी केले ग्रामपंचायतचे कौतुक

देशोन्नती वृत्तसंकलन....




**लातूर** ■ दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ रोजी विशेष करून वसुली दिनानिमित्त एकाच दिवसात सिकंदरपूर ग्रामपंचायतने पाच लाख पाच हजार पाचशे तेवीस रुपये कर वसुली केल्याबद्दल सोमवार दिनांक १३ मार्च २०२३ रोजी आदिनाथ मंगल कार्यालय, आर्वी येथे विशेष कर वसुलीच्या तालुका स्तरीय सन्मान सोहळ्यात लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) दत्तात्रय गिरी, लातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांच्या हस्ते सिकंदरपुरच्या उपक्रमशील सरपंच रेशमा माधवराव गंभीरे, ग्रामसेवक कलबुने के. बी., संगणक ऑपरेटर महेश गंभीरे, ग्राम रोजगार सेवक दिगंबर कदम, ग्रामपंचायत कर्मचारी गहीणीनाथ बोयणे, भास्कर गरगट्टे, महिला बचत गटाच्या अध्यक्षा राजेश्वरी जाधव, सचिव भाग्यश्री गंभीरे यांचा गुलाब पुष्प व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

Deshonnati Edition
Mar 17, 2023 Page No. 1
Powered by : eReleGo.com

पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 3
26 Jun 2021

विलासराव देशमुख फाऊंडेशन व निराधार समिती लातूर ग्रामीणच्या वतीने

### पात्र निराधारांना विविध योजनांचे अर्ज वाटप



**लातूर** : विलासराव देशमुख फाऊंडेशन व निराधार समिती लातूर ग्रामीण यांच्या वतीने दि. २४ जून रोजी लातूर तालुक्यातील सिकंदरपूर येथे निराधारांच्या समस्या जाणून घेऊन नवीन पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांच्या अर्ज वाटप करण्यात आले.

यावेळी समितीचे अध्यक्ष प्रवीण पाटील यांनी विविध योजनांविषयी सखोल मार्गदर्शन केले आणि पात्र लोकांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे आश्वासन दिले. कार्यक्रमास विलासराव देशमुख फाऊंडेशनचे समन्वयक संगीता मोळवणे, सरपंच रेश्मा गंभीरे, माधव गंभिरे, सदस्य शिवाजीराव देशमुख, उद्धव गंभिरे, लष्करे, गोपाळ सुरवसे, तंटामुक्तीचे अध्यक्ष बालाजी पवार, बंकटराव देशमुख, गावातील लाभार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे [illegible] गोपाळ सुरवसे, [illegible] सुरवसे [illegible]

ग्रामसंसद, सिकंदरपूर

ता.जि.लातूर

# धन्यवाद!